# मिरा भाईंदर महानगरपालिका
## विशेष स्थायी समिती सभा दि. १५/०५/२००८

मिरा भाईंदर महानगरपालिकेची विशेष स्थायी समिती सभा गुरुवार दिनांक १५/०५/२००८ रोजी सभा सुचना क्र. ०२ दि. १४/०५/२००८ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मॉरस जोसेफ रॉड्रिक्स हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. मॉरस जोसेफ रॉड्रिक्स | -- | सभापती |
| २) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | -- | सदस्य |
| ३) | ॲड. एस.ए. खान | -- | सदस्य |
| ४) | श्री. मिलन वसंत म्हात्रे | -- | सदस्य |
| ५) | सौ. शानु गोहिल | -- | सदस्या |
| ६) | सौ. सुनिता कैलास पाटील | -- | सदस्या |
| ७) | सौ. नयना गजानन म्हात्रे | -- | सदस्या |
| ८) | श्री. गणेश गोपाळ शेटटी | -- | सदस्य |
| ९) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | -- | सदस्य |
| १०) | श्री. शरद केशव पाटील | -- | सदस्य |
| ११) | श्री. प्रकाश पांडुरंग ठाकूर | -- | सदस्य |
| १२) | सौ. ज्योत्स्ना हसनाळे | -- | सदस्या |
| १३) | श्री. प्रशांत भगवंतराव पालांडे | -- | सदस्य |
| १४) | श्री. टेरी पॉल परेरा | -- | सदस्य |
| १५) | श्री. राजु भोईर | -- | सदस्य |

**गैरहजर सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल | -- | सदस्य |

**मा. सभापती :-**

नमस्कार, या सभेला उपस्थित असलेले सर्व सन्मा. सदस्य / सन्मा. सदस्या, महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी वर्ग आपले सर्वांचे मी हार्दिक स्वागत करतो. त्यांनी ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडण्यास मला सहकार्य करावे अशी मी सर्वांना विनंती करतो आणि आजच्या सभेला सुरूवात करावी अशी मी सचिवांना विनंती करतो.

(नगरसचिव यांनी विषय पत्रिकेचे वाचन केले.)

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४, निविदांना मंजुरी देणे. (आरोग्य विभाग) सगळ्यांना गोषवारा दिलेला आहे.

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब, आता ही जी सभा बोलवलेली आहे ह्याचे कारण काय आहे?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो की, निविदा मंजुरी साठी ही सभा बोलवलेली आहे.

**शरद पाटील :-**

निविदा मंजुरीसाठी ही सभा बोलवलेली आहे. पण आता आचारसंहिता आहे. तुम्ही तसे पत्र दिलेले आहे. बरोबर आहे. मग, निविदा मंजुरी करण्यासाठी म्हणजे ह्याचे कारण काय होते?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

आपल्याला वर्षांत नाले साफसफाई करण्यासाठी आपण आयोगाची मंजुरी घेतली होती.

**शरद पाटील :-**

आता ह्याच्यात किती अबोव किती बीलो आहे? ह्याचा हिसाब काय आहे? आणि गेल्यावर्षी आपला रेट काय होता? आम्हाला गेल्या वर्षीचा रेट सांगा?

**प्रशांत पालांडे :-**

साहेब मग, गेल्या मा. महासभेमध्ये आपण काय मंजुरी दिली होती? किती कॉन्टीटी ठरवलेली काय?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

ढोबळ मानाने आपण दरवर्षी ९५ नाले साफसफाई करतो त्याच्या व्यतिरिक्त आपण २० नाले साफसफाई करतो.

**प्रशांत पालांडे :-**

तेवढे करायचे असे आपण मा. महासभेत बोलले होते.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

ते करायचे आहे. सन्मा. सदस्यांनी वेगवेगळ्या नाल्याची सुचना केलेल्या आहेत ते पण आपल्याला ॲडीशन करून करायचे आहेत.

**प्रशांत पालांडे :-**

म्हणजे आपण फक्त हे रेट ठरवतो.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

हो फक्त रेट ठरवतोय.

**प्रशांत पालांडे :-**

ते किती लागणार?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

ते आता सगळ्या गोष्टीने अंदाजित आहे.

**प्रशांत पालांडे :-**

हे फक्त मशिनरीचे रेट.....

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

आपण रेट मंजुर करणार आहोत आवश्यकते नुसार आपण ते वापरणार आहोत.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मा. पाणपट्टे साहेब, नाले सफाईमध्ये नालेसफाई, खोदाई एकत्रच आहे का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

हो एकत्रच आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

एकत्र आहे. तर मग माती उचलून नेणे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

ते पण एकत्र आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

पण तुमचे कॉन्ट्रॅक्टर माती उचलून नेत नाही ती माती साईडला लावतात आणि मग ती माती तशीच साईडला पडलेली असते. मग ती माती पुन्हा आतमध्ये उतरते.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

तसे होणार नाही. त्यात सर्व गोष्टी आहे. ह्या वेळेला तसे होणार नाही. आपण वर्ग - १ अधिकाऱ्यांची नेमणूक करणार आहोत. नोडल ऑफिसर म्हणून त्यातले ज्युनियर इंजिनियरची नेमणूक करणार आहोत. संबंधित एस.आय., प्रभाग अधिकारी असे मिळून आम्ही रोजच्यारोज सकाळी एक महिनाभर हेच काम करणार आहोत आणि त्यामुळे कुठल्याही डम्परची माती निघाली की, आम्ही तत्काळ उचलणार आहोत.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

असे तर प्रत्येक वर्षी बोलतात. प्रत्येक वर्षी असेच होते.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

ह्या वर्षी बघा.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

माझ्या वॉर्डमध्ये जास्त नाले आहेत मी तुम्हाला तिथे उभे करणार.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

आम्ही पर्सनली प्रत्येक वॉर्डमध्ये विझीट देणार.

**शरद पाटील :-**

साहेब, आपण ही टेंडर ओपन कधी केली?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

६ तारखेला टेंडर ओपन केले.

**शरद पाटील :-**

मग, तुम्ही सभा घ्यायला एवढा उशीर का लावला?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

स्क्रुटीनींग करायला लागते. जेवढे....

**शरद पाटील :-**

स्क्रुटीनींग करायला केवढे दिवस लागतात?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

ब-याच निविदाकारांचे अर्ज होते. प्रत्येक पेपर चेक करायला लागणार आहे. आणि सगळे इलेक्शन मध्ये बिझी असल्यामुळे आणि बेलवटे साहेब पण इलेक्शनमध्ये बिझी होते. त्यामुळे हे दोन दिवसात फायनल झाले आणि कमिश्नर साहेब आउट ऑफ इलेक्शन असल्यामुळे त्याची मंजुरी काल मिळाली तेव्हा आम्ही लगेच काल अजेंडा काढला आणि त्यामध्ये दोन दिवस सुट्टी होती.

**नयना म्हात्रे :-**

जर आपण नाले साफसफाईचा ठेका दिला मग ते ठेकेदार काय करतात तुम्हाला माहित आहे का? नाले साफसफाई रात्री करतात मग ते किती तास जे.सी.बी. चालली काय काम केली?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

आपण संपुर्ण रेकॉर्डींग करणार आहोत, व्हिडीओ शुटींग करणार आहोत.

**नयना म्हात्रे :-**

साहेब रात्री व्हीडीओ शुटींग होत नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

असे कोण म्हणते?

**शरद पाटील :-**

ठिक आहे. व्हिडीओ शुटींग होत नाही आणि रात्री मोटर लावल्यामुळे काम करून.....

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

सकाळी ८.०० वा. लवकर सुरू करू.

**शरद पाटील :-**

रात्री काय काम करणार काही काम होत नाही. एकतर रात्री असे पण काही दिसत नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

सकाळी ८.०० वा. सुरू करायचे ते संध्याकाळ ६.०० वाजेपर्यंत सुरू ठेवायचे.

**शरद पाटील :-**

दुसरी गोष्ट अशी की, तुमचे प्लानींग काय आहे? जसे तुम्ही नाले साफसफाई करायला घेणार आहेत. तर त्याचे काय प्लानिंग आहे? मिरा रोडला तुम्ही काय केले? मिरा रोडला जेव्हा पाणी भरते तेव्हा येथे पाणी भरते.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

आपल्या हायवेच्या येथे अकरा उघाडी आहे ते आणि बाकीचे जे ९५ नाले आहेत आणि बाकीच्या ठिकाणी माती गाळ वगैरे आहे ते काढणार आहेत.

**शरद पाटील :-**

साहेब, मिरा रोडला जेथे नाले मोठे होते ते आता छोटे नाले झालेले आहेत. त्याचे तुम्ही काय केले?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

ते मोठे नाले करणार ना.

**शरद पाटील :-**

खोदणार सांगतात पण तुम्ही काय खोदणार? आणि काय खोदायला सांगणार? प्लॅनिंग असेल तर खोदणार ना.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

हो पण त्याठिकाणी स्लोप किती असणार आणि त्याठिकाणी इंजिनियर असणार ना.

**शरद पाटील :-**

इंजिनियर आणणार पण सध्या तुमच्याकडे प्लॅनिंग मॅप वगैरे आहे की नाही. तुम्ही मॅप वगैरे काढले का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

हो काढलेले आहे.

**शरद पाटील :-**

मग त्याचा मॅप कुठे आहे? आहे तर दाखवा ना. आम्हा सर्व सदस्यांना मॅप दाखवा मग माहित पडेल ना.

**नयना म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, हे ठेकेदार बघा काय बोलतात आपल्या नालेसफाईचे कामगार तीन वाजता सुटले की, त्याच लोकांना परत बोलवायचे ४.०० वा. ते लोक कामाला लागतील मग ६.०० वा. सुट्टी करतील म्हणजे साहेब ८.०० तासाचा काम दोन तासामध्ये होवू शकते का? म्हणजे हे ठेकेदार किती गंडवतात. ते तुम्ही बघा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

सन्मा. सदस्य नयना म्हात्रे मी ह्याच्यावर खुलासा करू इच्छितो की, नाले सफाईचे वेगळे कामगार आहेत. त्याच्यामध्ये दैनंदिन साफसफाईचे कर्मचारी घेणारच नाही.

**नयना म्हात्रे :-**

ठिक आहे. म्हणजे जे रोजचे कामगार आहेत त्यांना तुम्ही घेणार नाहीत.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

त्यांचा संबंध नाही.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही ठरवणार कसे? कारण तुम्हाला सांगतो की, तुम्ही ह्या ज्या निविदा काढल्या आहेत. त्याच्यामध्ये मनाला वाटेल तसे तुम्ही अटीशर्ती टाकलेल्या आहेत. अहो आता सक्षम पंप बसवायला कशाला दोन वर्षाचे अनुभव पाहिजे गरज काय आहे? आता पर्यंत तुम्ही जे ठेके दिले किती लोकांचे पंप पावसात चालले. आम्हाला माहित आहे. माझा वॉर्ड संपुर्ण खाडी किनाऱ्या लगतचा आहे पाणी भरले कसे? निघते कसे? त्याला नॅचरल सोर्सेस काय आहेत? ते सगळं आम्हाला चांगले माहित आहे? पंप आणि पाईप पुरवठा करायला तुम्हाला अनुभव कशाला पाहिजे? तुमची मान्यता प्राप्त एकतर कंपनी असेल ना. जी कुठली सिमेंटची मान्यताप्राप्त पाईप लाईनची कंपनी आहे. मान्यता प्राप्त कंपनीचा माल पुरविणारे ठेकेदार म्हणजे कोणीही असूदे. तुम्ही त्या सगळ्या ह्याच्यामध्ये जाणून बजुन एक चेन केली. आता त्याच्या बातम्या यायला लागल्या.मारामारी व्हायला लागल्या. एखाद्या कुठल्या पक्षाचे ठेकेदार जर वरचढ होत असेल तर त्याला वेसन घालणं तुमच काम आहे की, तुम्हीच वाढवायला पाहिजे. आणि तुमच्या इकडे मी एक पत्र दिले की, हे टेंडर वगैर निघताना पोलिस प्रोटेक्शन मागवा. आठवडा झाल्यानंतर काही प्रकार घडले. ह्या शहरामध्ये जर मारपीट करायला तयार असेल. तर आम्ही सुद्धा करु शकतो. पण प्रशासन म्हणजे प्रशासन. अधिकारी काय करतो? एखाद्या कुठल्या पक्षाची ठराविक माणसं उतरुन इकडे चेरिंग करतील तुमच्या ॲडव्हटाईज च्या ह्याच्यात सुद्धा लोकांना फॉर्म भरुन दिले नाही बायर इंडियाच्या माणसाने येवून तिकडे फॉर्म भरताना त्याला धमकावले आणि हाकलून लावले. ही धर्मशाळा आहे का? की महापालिकेचे ऑफीस आहे आणि हे सर्व सगळ्यांना माहित असते. ठेकेदार आले तर आपल्या उपायुक्त साहेबांनी सांगितले की पोलिस स्टेशनला जावून एन.सी. कर. अहो खून झाल्यानंतर एन.सी. करायची का? तुमच्या कार्यालयात तुमचे काय काय आहे? फक्त पगार घ्यायचा आणि गाड्या उडवायच्या. एका उपायुक्त साहेबांनी त्या ठेकेदाराला सांगितले की पोलिस स्टेशनला जावून एन.सी. कर. अहो आज महापालिकेचे कॅम्पस आहे. ह्याचे मालक तुम्ही आहात. इकडे काय जे घडते्. त्याच्यात तुम्ही पहिला ॲक्शन घेतली पाहिजे आणि तुम्ही पोलिसांना बोलवले पाहिजे. माझ्या घरात चोर घुसला तर मी पहिला पोलिसांना बोलवणार हे माझे काम आहे. कोणाला जर वाटत असेल की आम्ही लोक गप्प होते. हे बघा. भाईच्या पेक्षा जास्त भाई आम्ही आहोत. हे लक्षात घ्या. आम्हांला सगळें धंदे करता येतात. एखादा कोण जर वरचढ असेल तर त्याला लाईनीवर आणता येते. तुम्ही आणा नाहीतर आम्ही आणू. हे चालणार नाही. आम्ही बघतो. बाहेरची लोक येवून उभे राहतात. फॉर्म खेचून घेतात. मारहाण होते. वीस वीस बायका आणतात. पंधरा पंधरा पोर आणतात. तुम्ही काय ऑफीसमध्ये झोपा काढता. तुम्ही बोलू नका. आम्ही स्वतः त्याचे साक्षीदार आहोत. मी ॲफीडेविट वर देईन. तुम्हांला मजाक वाटते का? एक ठेकेदार आला तर उपायुक्त साहेब बोलतात की पोलिस स्टेशनला जावून कंम्प्लेन्ट करा. संबंध काय आहे? त्या ठेकेदाराला निघताना कोणीतरी गेटवर मारले. गॅरेन्टी काय आहे? हातातले फॉर्म खेचल्यापर्यंत तुमची एवढी दादागिरी आहे. ते सर्व ठेकेदार भाई झाले का? आणि तुमचाही त्याला सपोर्ट. तुम्ही लिहिले की बाहेर टेबल ठेवणार. प्रत्येक महापालिकेचे ओपन टेंडर असायचे. ओपन टेबल ठेवले जाते. हे बघा. काम कोणीही घ्यावे. कोणी काय कोणाला द्यावे हे महत्त्वाचे नाही. आणि आम्ही त्याला महत्व पण देत नाही. पण एखाद्या विशिष्ट माणसाने येवून येथे दादागिरी करायची, भाईगिरी करायची फॉर्म घेवून द्यायचे नाही. ठराविक कंपन्यांना तुम्ही लॉबिन करायचे. हे काय चालले आहे? हे युनियन कशासाठी बनलेले आहेत? त्या युनियनचा संबंध काय आहे? युनियनच्या लोकांनी ठरवायचे की काम कोणाला द्यायचे ते आणि कोणी? अहो ठेकेदार कंपनीना तुम्ही क्युरी करता आणि जे मागचे तुमच्या तीन वर्षाचे रेकॉर्ड सांगू का? तुम्ही अनुभवलेले आहेत म्हणून मी बोलतो. अनुभव म्हणजे कसला अनुभव. चोऱ्यामाऱ्या करायचे अनुभव ज्या लोकांचे तुम्ही टेंडर स्विकृत केलेले आहे. त्या लोकाचां मजूर पुरवठा कामे करण्यामध्ये ४०-४० मजूर दररोज नित्याचे कमी आहेत. हे गेल्या तीन वर्षाचे अनुभव आहे. तुम्ही रजिस्टर लावाल का? तुम्ही कधी रजिस्टर चेक केल का? १०० मजूरांना तुम्ही परवानगी देता. ७० मजूर हजर असतात. हे तीन वर्षाचे अनुभव आहे. हे सगळ्या अधिकाऱ्यांना माहित आहे. हे अनुभव तुम्ही जाणून बघितले का की १०० माणसांचा पगार घ्यायचा आणि ७० माणसे कामाला घ्यायची. तुम्ही असे अनुभव चेक करता का? तुम्हांला हे अधिकार कोणी दिले की तीन वर्षाचे अनुभव चार वर्षाचे अनुभव बघा म्हणून आता तुम्ही मला एक सांगा की तुम्ही गेल्या तीन वर्षाचे ॲग्रीमेंट त्या पटलावर ठेवा आम्हांला सगळें भाव चेक करायचे आहे. डी.एस.आर. रेटप्रमाणे तुम्ही आम्हांला गोषवारा दिला का? डी.एस.आर. रेट सुद्धा मागवा त्या शिवाय मिटींग संपणार नाही. मा. आयुक्त साहेबांनी काल आम्हाला सांगितले की इमरजन्सी आहे तर त्याला आपण मंजूरी द्या. तर आम्ही मंजूरी देवू. इमरजन्सी आहेत माझ्या वॉर्डमधले सुद्धा नाले साफ झाले

पाहिजे. पण त्याचा अर्थ असा नाही की, १०० रु.ची वस्तू आहे आणि तुम्ही ६०० रु. लावाल. डी.एस.आर. रेट इकडे द्या. मा. सभापती साहेब मी डी.एस.आर रेटप्रमाणे रेट काढले्. ह्या लोकांनी दहा पटीने जास्त किंमती लावलेल्या आहेत. डी.एस.आर. रेट मागवा सिटी इंजिनियरचा कॉल करा. डी.एस.आर रेट घेवून तो डि.एस.आर. रेट वाचणारा माणूस आम्हांला इकडे पाहिजे. काय पाहिजे ते इमरजन्सी तुम्ही रेट द्याल आणि मंजूर कराल असे होणार नाही.

**नयना म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब मुंबई महानगरपालिकेने असे सांगितले की आपण ज्या ठेकेदारांना ठेके देतो. तो ठेकेदार जर व्यवस्थित काम नसेल करत तर त्याचे काळ्या यादीमध्ये नाव टाकावे म्हणून तिकडच्या स्थायी समिती सभापती साहेबांनी ठरवलेले आहे. तसे तुम्ही पण आज तेच ठरवा. कारण मुंबई महानगरपालिकेने तसेच ठरवलेले आहे. पेपरला बातमी आहे.

**मिलन म्हात्रे :-**

काळे, पांढरे, पिवळे ह्या अधिका-यांना ह्या यादीमध्ये घालायला लागतील.

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब सन्मा. सदस्य म्हात्रे साहेबांनी जे सांगितले. त्यांच्याशी् मी सहमत आहे. एकतर तुमची गोष्ट अशी आहे की, तीन वर्षाचा एक्सपेरियन्स पाहिजे. जर नविन माणूस बी.कॉम पास झाला. आणि त्याला एक्सपिरियन्स नसेल तर त्याला नोकरी द्यायची नाही. हा कुठचा नियम आहे?

**मिलन म्हात्रे :-**

हे बघा. तुम्हांला डी.एस.आर. रेट मान्य आहे ना. कम टू दी पॉईंट २००७-०८ ठाणे जिल्हाकरिता राज्य शासनाने मान्यता प्राप्त दिलेला डि.एस.आर. रेट तुम्हांला मान्य आहे की नाही. आणि तो महानगरपालिकेला लागू होतो की नाही. एवढे पहिला सांगा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त साो.) :-**

डी.एस.आर. रेट मान्य आहे

**मिलन म्हात्रे :-**

डी.एस.आर रेट नुसता मान्य नाही. डी.एस.आर रेट नुसारच तुम्हांला टेंडर काढायची आहेत. नाहीतर आम्हांला लेखी द्या.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त साो.) :-**

साहेब मला खुलासा तरी करु द्या.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब कसले खुलासे करता? शंभर, सव्वाशेचा डिफरन्स असेल तर आम्ही समजू शकतो. विषय येवू द्यावा. तुम्हांला मी सुचना दिली ना. तुम्ही डी.एस.आर रेट चे पुस्तक इकडे मागवा. तुमचे कोण माणसे आहेत त्यांना बोलावून घ्या. आमची सुचना आहे. आणि मग आपला इकडे कार्यक्रम चालू करु या. साहेब आम्ही सुद्धा डी.एस.आर रेट जिल्हा परिषद कडून विकत आणलेला आहे. ५५० रु. किंमत आहे त्या पुस्तकांची हे सगळे करायला लागते कारण विश्वासार्थ अधिकारी नाही.

**शरद पाटील :-**

जोपर्यंत येथे युनियनची मोनोपोली येथे चालत राहिल ना. तोपर्यंत येथे कॉम्पीटीशन होणार नाही. आणि असेच अबोव्ह राहून असेच टेंडर येत राहतील.

**मिलन म्हात्रे :-**

ती युनियन तरी तुमचे भले करते का? अबोव्ह ५०टक्के कुठचा कायदा बोलतो. कसल्या ह्या युनियन आल्या.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त साो.) :-**

ह्याच्यात कुठले अबोव्ह रेट आहे. गेल्यावर्षी प्रमाणेच आपण आकारतो.

**मिलन म्हात्रे :-**

हे अबोव्ह तुमच्या पाईपमध्ये येईल. जास्त ही कशाला बोलता हे सगळं पाईपमध्ये येईल.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त साो.) :-**

मी तुम्हांला खुलासा करतो. पाईप हे गेल्यावर्षी जे.सी.बी. मार्फत आपण बसवू शकतो आणि ह्यावर्षी् जे.सी.बी. मार्फत त्यांनी बसवायचे आहेत ते आपण ॲडीशन केले आहेत. म्हणून त्या किंमती ...

**मिलन म्हात्रे :-**

हे बघा. येथून खाल्ले तरी तोंडात जाणार आणि असे जरी खाल्ले तरी तोंडात जाणार.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त साो.) :-**

आणि सिमेंटचे आणि स्टिलचे रेट वाढले् असून..

**मिलन म्हात्रे :-**

तुमचे रेट काय आहे ते जरा वाचून सांगा. शवेटची ओळ काय आहे ते जरा वाचून सांगा. मा. आयुक्त साहेबांच्या मान्यतेनुसार तसेच तपासून वाचा नाहीतर तर पाठवून वाचा. अहो कल्याण डोबिंवलीचे दहा

नगरसेवकांनी १० लाख रु. ची पाईप लाईन विकत घेतली म्हणून ते जेलमध्ये गेले. जे निवडून आले ते पण त्या वेळेला नगरसेवक पडले ते पण आमची काय इनवॉलमेंट असेल तर आम्ही आरामशीर गळ्यात हार घालून जेलमध्ये बसू. खाईल कोण आणि तोंडाला आमच्या लागणार तर ती भानगड कशाला पाहिजे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

मागील सन २००७-०८ ह्या आर्थिक वर्षात ठेकेदार मार्फत आर.सी.सी. पाईप फक्त पुरवठा करण्याचे दर मागवले होते. मात्र ह्यावर्षी आर.सी.सी. चे एन.पी.थ्री पाईपचा पुरवठा करण्याचा..

**मिलन म्हात्रे :-**

साहेब तुम्ही कुठले पान वाचता. मा. आयुक्तांच्या मान्यतेनुसार तुम्ही कुठले वाचला. विविध क्षमतेचे सक्षम पंप आर.सी.सी. पाईप पुरवठा करणे 'क' आहे. हा झाला तुमचा तक्ता सोडून द्या. तक्ता आपण नंतर वाचू या मनपा क्षेत्रात पावसाळ्याच्या दरम्यान सखल भागात पावसाचे पाणी तुंबले असता सदर पाण्याचा उपसा करण्यासाठी विविध क्षमतेच्या सक्षम मशिनचे दर मागविण्यात आले होते. कमी दराच्या निविदाकारांना वाटाघाटीसाठी बोलवले होते. वाटाघाटी काय प्रकार आहे? पहिला वाटा आणि मग घाटी का? प्रत्येक बाबतीत वाटाघाटी आमचे मानधन देताना तुम्ही कधी वाटाघाटी नाही केल्या. तिकडे सांगणार की तुम्हांला चार च्यावरती मिळणार नाही आणि कसल्या वाटाघाटी करोडोच्या कामात पण वाटाघाटी साहेब मग ह्या टेंडरला अर्थ काय राहतो? साहेब मुंबईमध्ये ५०पैसे, २० पैसे जरी कमी रेट असले रेल्वेमध्ये, एम.टी.एन.एल. मध्ये, ह्या सगळ्या गर्व्हमेंटच्या बॉडीज आहेत त्या सगळ्या २०-२५ पैशांवरती टेंडर होतात. कसल्या आल्या वाटाघाटी पहिला वाटेल तसे रेट द्यायचे. आणि मग वाटाघाटीला हजार रु. कमी करतो, २५ कमी करतो. मग ५० कमी करतो. मग ह्या प्रोसेसला किंमत काय राहिली? अर्थ काय राहिला ते मला सांगा. एखाद्या टेंडर वाल्यांनी ५ रु. कमी भरले. तर उद्या वाटाघाटीत मी तुम्हांला १०० रु. जास्ती देणार आणि मग डायरेक्ट ९५ रु. कमी करणार मग तुमचे प्रोजेक्शन काय असते. ह्या माणसांनी ९५ रु. कमी दिले म्हणजे..

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

वाटाघाटी म्हणजे. तुमचे हे रेट कसे जास्त आले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

हे बघायचेच नसते. टेंडर कशाला म्हणता? तुम्ही जिल्हा परिषदेचे सगळे टेंडरचे नॉर्म्स काढा. टेंडर रू. १५० का भरलेत कशाला म्हणता? अनुभव तीन वर्षाचा आहे ना. म्हणजे त्याला सगळे माहित आहे. मग त्यांनी रेट भरला तो त्याच्या बुद्धीने भरलेला आहे. मग तुम्ही त्याच्याबरोबर परत बोलता का ओ बापू. तुम्ही १४५ रु. का नाही भरले? मग तुम्ही त्याला रिजेक्ट दाखवून बाहेरचा दरवाजा दाखवायचा असतो.

**मा. सभापती :-**

पानपट्टे साहेब ह्या वाटाघाटीचा नियम आहे का? हे नियमात बसते का?

**मिलन म्हात्रे :-**

काही बसत नाही. इम्पॉसिबल आहे. तुम्हाला कोण बोलते? टेंडर कशासाठी मागवता? त्या वाटाघाटीमध्ये काय होते? शेवटला जो टेंडर कमी भरतो ना. त्याला तुम्ही दरवाजे दाखवता आणि वरचे जे लोक असतात ते किती टेंडर फुटतात. सांगतो ना. वाटाघाटी म्हणजे सुवर्णमध्य कसे आहे ते तुम्हांला सांगतो.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

ज्याचे निविदामध्ये लोवेस्ट आहे. त्यालाच फक्त वाटाघाटी बोलतो. त्याच्यापेक्षा अजून कमी करण्यासाठी त्याला आपण बोलावतो.

**मिलन म्हात्रे :-**

हा काय अर्थ झाला का? तुमची टेंडर नोटिस काय आहे? कमीत कमी दर असेल त्याला किंवा जर तुमचे काही खरेदी करायचे आहे. जास्तीत जास्त रक्कम देईल तो. हा शब्द आला ना. म्हणजे दहा लोकांमध्ये तुम्ही ठरवले की ज्याचे कमीत कमी किंवा जास्तीत जास्त फायनल फिगर असेल त्याला टेंडर देवून टाकायचे. वाटाघाटी काय प्रकार आहे?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

त्याच्यापेक्षा अजून कमीत कमी.

**मिलन म्हात्रे :-**

कशासाठी ? म्हणजे तुमची पहिल्याची चुकीची व्हॅल्यूएशन आहे. मग, तो लिलाव बरा. शंभर रु. तर मी बोलेन ११० रु., दुसरा बोलेल १२५ रु. चौथा बोलेल १४० रु. मग तो लिलाव बरा ना. ही सगळी प्रोसिजर करता कशाला? सक्षम पंप बसवण्याकरिता तुम्हांला अनुभव कशासाठी पाहिजे हे जरा मला सांगा. काही गरज आहे का? अहो मिरारोडमध्ये भाड्याने मिळतात. तुम्हांला किती पाहिजे मी देतो. कमीत कमी रेटमध्ये. आता हे सगळं निघेल.

**मा. सभापती :-**

तुम्ही वाटाघाटीच्या वेळेला तुम्ही ज्यांचे लोवेस्ट रेट आहे त्यांनाच बोलवता ना.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

हो कारण त्यांना अजून ह्याच्यापेक्षा काय कमी करता येईल का?

**मा. सभापती :-**

आणि अबोव्ह वाल्यांना बोलवत नाही ना.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब तो पण अबोव्ह आहे ना.

**शरद पाटील :-**

ज्याला वाटाघाटीसाठी बोलवले ना तो पण अबोव्ह आहे.

**मा. सभापती :-**

ते सांगतात की नाही बोलवत.

**शरद पाटील :-**

तो पण अबोव्ह आलाच.

**मा. सभापती :-**

अबोव्ह कसा आला? तो बिलो आहे.

**शरद पाटील :-**

त्याच्या त्यांच्यात बिलो आला पण आपल्या टेंडरपेक्षा अबोव्ह येते ना. आपले जे टेंडर येते ना. त्याच्यापेक्षा अबोव्ह येते ना की बिलो येते.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

मागच्या रेटप्रमाणेच करायला सांगितले.

**शरद पाटील :-**

वाटाघाटीला बोलवल्यानंतर ना. मग तेच सांगतो ना. पहिला हे अबोव्ह वालेच आहेत आणि ह्याचे कारण आहे की ह्याच्यात तुमचे ठेकेदार तीनच. आलटून पालटून तीनच ठेकेदार येथे कॉम्पीटीशन होत नाही. म्हणून ही परिस्थिती येते नाहीतर परत वाटाघाटीला बोलवण्याची गरजच लागणार नाही. जर ह्याच्यात कॉम्पीटीशन झाले तर, परत वाटाघाटीला कोणाला सुद्धा बोलवण्याची गरज लागणार नाही. ह्याच्यापेक्षा कमी रेटने जाईल.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब हे बघा वाईट कोठे वाटते माहित आहे का? ह्या गेल्या दहा-बारा दिवसामध्ये मान्यता प्राप्त वर्तमान पत्रापासून छोट्या वर्तमान पत्रापर्यंत शहरामध्ये आमच्या स्थायी समिती मध्ये सदस्यांची आपल्या महापालिकेची एवढी अब्रू गेली ना. आता काल परवाचे पेपर बघा. अक्षरशः नाक्या नाक्यावर लोक भेटून आम्हांला विचारतात. तुम्ही १६ करोड रु., १५ करोड रु., १२ करोड रु. तुम्ही बोलता, सफाई चालू कुठे आहे. लोकांना तेवढे कळत नाही. आचारसंहिता लागले. काम अडकलय हे आम्हांला माहिती आहे. साहेब लोकांना काही कळत नाही. आणि आमच्या नगरसेवकांना काय संबंध आहे? ह्या टेंडर फिक्सिंग मध्ये आमचे काही घेणे देणे नसते. रेट ठरवायला आम्ही येतो का? नाही तुम्ही रेट ठरवलेत. तुम्ही परवाच्या मा. महासभेमध्ये जेव्हा हा ठराव आणला तेव्हा तुम्ही मागचे ॲग्रीमेंट प्रोजेक्ट का केले नाही? तुम्ही आमच्याकडून आर्थिक मंजूरी घेतली ना. मग त्यावेळेला मागच्या मिटींगमध्ये सेक्शन ७९, ७८ मध्ये क्लिअर कट म्हटलेले आहे. कुठल्याही महापालिकेच्या आर्थिक बाबतीत मा. महासभेची पहिली परवानगी घ्यायची. तुम्ही जर मागच्या ॲग्रीमेंटचा आधार देता मग मी ॲग्रीमेंट आमच्या मा. महासभेत ठेवली का? का वाटली नाही? की ह्या ॲग्रीमेंट नुसार अमुक अमुक रेट होता. हे सर्व सदस्यांना अवलोकनार्थ सादर केले पाहिजे होते. तुम्हांला काही बंधन होते का? तुमच्या डिपार्टमेंट च्या अधिकाऱ्यांना काही त्रास होत होता का? तुम्ही जर ह्या ठरावामध्ये मागच्या ॲग्रीमेंट चा रेशो पकडता. उदा. देता, मग तुम्ही आम्हांला ते दाखवले का नाही? आता तुम्ही सांगितले की मागच्या ॲग्रीमेंट तर आजही आमच्याकडे मागचे ॲग्रीमेंट नाही. मागचे ॲग्रीमेंट मागवून घ्या आम्हांला रेट बघायचे आहे.

**शरद पाटील :-**

मागच्या ॲग्रीमेंट मध्ये जे रेट टाकले ते आम्हांला दाखवा ना की त्यांना तीन वर्षाचा एक्सपिरीयन्स पाहिजे. दोन जे.सी.बी. नावावर पाहिजे. अशा सगळ्या अटी पहिल्यापासून आहेत की नाही ते आम्हांला दाखवा ना.

**मिलन म्हात्रे :-**

जोपर्यंत मागचे ॲग्रीमेंट दाखवत नाही तोपर्यंत आम्ही हा विषय संपवणार नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

तुम्हांला दोन दिवसात देतो किंवा उद्या देतो.

**मिलन म्हात्रे :-**

उद्या किती वेळ? सगळ्यांना कामे आहेत आपण ॲग्रीमेंट करतो त्या एस.आय. त्या इम्लिमेंटेशन करणारा तुमच्या ह्याच्यातचा महत्त्वाचा घटक एस.आय.आहे. त्याला आम्ही तक्रार दिल्यानंतर ॲग्रीमेंट जाते. दहा दहा वेळा पत्र व्यवहार करुन त्याला ॲग्रीमेंटच नाही. ठेकेदार कोण? त्याचे किती माणसं पोचती करायची? औषध कुठचे वापरायचे? अवजारे कुठची? म्हणजे टेंडर संपेपर्यंत. परत तुमचे मच्छर मारायचे

औषधाचे टेंडर होते ना. आपली बोंबाबोंब झाल्यानंतर त्याला ॲग्रीमेंट मिळाली म्हणजे वर्ष गेले फुकट. तुमचे टेंडरचे ॲग्रीमेंट हे कांबळे साहेबांकडे. एस.आय. लोकांना काहीच माहित नाही. तो ठेकेदार पाणी मारतोय. फिनायल मारतो की काय मारतोय.

**शरद पाटील :-**

साहेब मी तुम्हांला सांगतो की त्या लोकांना अजून प्रमाणात किती औषधे टाकायचे हे माहित नाही. किती औषधे टाकता किती नाही टाकायचे? त्यांना विचारले तर ते सांगतात की आम्हांला सांगितले तसे आम्ही करतो.

**मिलन म्हात्रे :-**

तुमच्यामुळे तो हुशार झाला. तुमच्या वॉर्डामध्ये केवढे मच्छर आहे. ह्यांच्या इकडचा मी मतदार आहे. रस्त्यावर उभा राहू शकत नाही. कनकिया ऑफिसच्या येथे मा. आयुक्त साहेबांच्या बंगल्याबाहेर तुम्ही फक्त तीन मिनिटे उभे राहून दाखवा. डोळ्यांत, नाकात, तोंडात सगळीकडे मच्छर जाते.

**शरद पाटील :-**

आपण एवढे पैसे खर्च करतो. पण त्याचा रिजल्ट काही नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

गेल्यावर्षी जे.सी.बी. चे ७५८ रेटे होते. ह्यावर्षी पण आपण तेच ठेवणार आहोत. पोकलेनचे १४११ होते.

**शरद पाटील :-**

गेल्यावर्षी जे.सी.बी. चा रेट काय होता?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

७५८ रेट होता.

**शरद पाटील :-**

मग आता किती आला आहे?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

आता निविदाचे दर ७९१ आहे.

**मिलन म्हात्रे :-**

नुसते ॲग्रीमेंट चालणार नाही. त्याला वर्क ऑर्डर पण पाहिजे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

साहेब त्याच्या जोडीलाच वर्क ऑर्डर असणार.

**मिलन म्हात्रे :-**

आपण त्याला गेल्यावर्षी ठेका दिला ना.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

दोनच असतात. जे.सी.बी., डंम्पर आणि पोकलन त्याचे.....

**मिलन म्हात्रे :-**

वर्क ऑर्डर असते. असे काय करता?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

वर्क ऑर्डरमध्ये तेच रेट असते. म्हणून वर्क ऑर्डर दिलेले असतात.

**मिलन म्हात्रे :-**

प्रश्न तो नाही. माझा मुद्दा असा आहे की तुम्ही जे हे दिले ना. हे ॲग्रीमेंट बनवले. हा तोच ठेकेदार आहे का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

तोच ठेकेदार आहे.

**मिलन म्हात्रे :-**

म्हणून त्याला त्याच्या नावाची वर्क ऑर्डर आहे का तो विचारतो.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

वर्क ऑर्डर आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आहे. मग ती सगळ्यांना दाखवा ना.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

गेल्यावर्षी जे.सी.बी. रेट ७५८ होते आणि निविदा कराने या वर्षी प्रस्तावित केली ते ७९१ म्हणजे साडे चार टक्के अबोव्ह केले. पोकलेन चे १४११ रु. होते. आम्ही गेल्यावर्षी प्रमाणे प्रस्तावित केले. निविदेचे रेट १५०० आलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तुमचा जे.सी.बी. इकडे किती आहे. ७५८ रु. आहे. ६०० रु. ला जे.सी.बी. मिळतो. आमच्या वॉर्डामध्ये मी १५-१५, २०-२०, दिवस वापरलेला आहे. २५,०००/- रु.चे पेंमेट मी केले. ६०० रु. जे.सी.बी. येतो. मी माझ्या प्लॉटला चालवला आहे. सकाळी ९ ते रात्री १०, ११, १२ वाजेपर्यंत. नॉन स्टॉप जेवणाची सुट्टी असेल तेवढेच. तुमच्या डी.एस.आर. रेटमध्ये जे.सी.बी.च्या भाड्याचे रेट काय आहे? डी.एस.आर. रेटचा तरी रेशो पकडा. आम्ही चार माणसं जमलो आम्ही सांगितले की तुम्ही घ्या १०० रु. मी लावतो २५ रु. तुम्ही लावा ७५ रु. आणि तुम्ही लावा ५० रु. मधल्याचे सेटलमेंट झाले ४५ रु.चे.

**शरद पाटील :-**

झाले ना. कारण तीनच ठेकेदार आहेत.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

साहेब, डी.एस.आर. रेटप्रमाणे इन्स्ट्रूमेंट नाले साफ करण्यासाठी काढले होते. तर ते इन्स्ट्रूमेंट जवळपास साडे तीन कोटी रु. आले होते.

**मिलन म्हात्रे :-**

आता किती आहे?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

आता दिड कोटी रु. मध्ये.....

**मिलन म्हात्रे :-**

असे कसे होईल? तुमच्याकडे रेट आता काढलेला आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

काढले होते. म्हणून तर आपण......

**मिलन म्हात्रे :-**

असे कसे? मार्केटला ६०० रुपयात जे.सी.बी. आज मिळतो. तुमचे गेल्यावर्षीचा रेट आहे ७५८ रु. आता, तुम्ही कोट केलेला आहे. ७९५ रु. आम्ही जर मार्केट पेक्षा १९५ रु. जास्त देतो. तर त्या डी.एस.आर. रेटने जास्त रेट कसा होईल? म्हणजे तुमचे म्हणणे आहे का? की डी.एस.आर. रेट पेक्षा तुमचा रेट कमी आहे. असे तुमचे म्हणणे आहे का? मी सांगतो ना. मी डी.एस.आर. रेट पूर्ण वाचून आलेलो आहे. फक्त तुमच्या ऑथोरिटी अधिकाऱ्याकडून मला ह्या मिटींगमधून हे रेट वधवून घ्यायचे आहे. मा. आयुक्त साहेबांबरोबर माझे बोलणे झाले त्यांनी सांगितले. मिटींगमध्ये ह्याला मंजूरी द्या. कामाची इमरजन्सी बघून म्हटलं ठिक आहे. साहेब पण ह्याचा असा अर्थ नाही की तुम्ही काहीही रेट द्याल आणि माझे मंजूर करु.

**शिवाजी बारकुंड :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. पाईपचा एम.पी.थ्री एक फूट ३०० एम.एम. डायमिटरचा १०१५ पर रनिंग मिटर.

**मिलन म्हात्रे :-**

एक फुट व्यासाचा किती आहे?

**शिवाजी बारकुंड :-**

१०१५ रु. प्रति रनिंग मीटर.

**मिलन म्हात्रे :-**

आपल्याकडे रेट किती दिलेला आहे. आपण कपात करु या बारकुंड साहेब आपण सिटी इंजिनियर आहात. आपण डी.एस.आर. नीट वाचा. मी वाचून आलो? त्याचा आपण व्यास घ्या. थिकनेस घ्या आणि आणि लांबी घ्या आणि सिमेंटचा, सोन्याचा, लोखंडाचा......

**शिवाजी बारकुंड :-**

साहेब हा पाईपचा रेट आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही रेट सांगितल्यावर ते उठून बोलतात की आमचा आठ फुटाचा आहे? म्हणजे आमचा ४ फुटाचा आहे.

**शिवाजी बारकुंड :-**

त्यांचे काही मला माहित नाही. हा जो डी.एस.आर. रेट आहे. तो २.५ मीटरसाठी १०१५ हा एक फुटाचा ढाई मीटर साठी झाला. हा डी.एस.आर. रेट आहे. कॉर्पोरेशन एरियामध्ये अजून ह्याच्यावर ५टक्के ॲड होतो. आपल्या डी.एस.आर. ला.

**मिलन म्हात्रे :-**

म्हणजे किती झाले?

**शिवाजी बारकुंड :-**

त्याच्यावर ३०० रु. ॲड होते.

**मिलन म्हात्रे :-**

म्हणजे आपण आणखीन ३०० रु. पकडू या. नियमानुसार अन्य रक्कम. १७२२ रु. चा पाईप महापालिका २४३७ रु. ला विकत होते.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त साो.) :-**

२४०० रु. पण नाही. ते जे.सी.बी. बसवून आहे.....

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही वरची जे.सी.बी. चे पण रेट टाकता. इकडे पाईप जे.सी.बी. चे लावता.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त साो.) :-**

पाईप आणणे आणि जागेवर बसवणे. त्याचा रेट आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मग वरची जे.सी.बी. कशासाठी मागवले?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त साो.) :-**

वरची जे.सी.बी. खोदण्यासाठी मागवले?

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही काय खोदणार?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त साो.) :-**

कच्चे नाले खोदणे आणि गाळ उपसण्यासाठी जे.सी.बी. पोकलेन लागणार.

**मिलन म्हात्रे :-**

हा जे.सी.बी. इकडे लागणार नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त साो.) :-**

नाही.

**मिलन म्हात्रे :-**

नक्की.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त साो.) :-**

हो नक्की.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही आमच्या त्याच्यात कुठे दिले?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त साो.) :-**

मी तुम्हांला सांगतो ना.

**मिलन म्हात्रे :-**

ठिक आहे. हे पकडून चला. तुमचेही मान्य आहे. तुमचे म्हणणे असे आहे का? की आता ५०० रु. चा फरक निघाला. तर पाईपची किंमत १७२२ रु. आणि फिटींग करायची किंमत ५५० रु. बरोबर आहे. म्हणजे १ तास जे.सी.बी. काम करतो. तो तुमच्या रेटनुसार ७९५ रु. घेतो आणि १ पाईप लावायला तुम्ही ५५०रु. पे करता १ पाईप १५ मिनिटाच्या आतमध्ये लागतो. १५ मिनिटे पण नाही १० मिनिटात लागतो कारण मी लावून घेतलेले आहे. आणि ८ तासाचे ७९५ रु. तुमचा रेट सांगतो आणि तुम्ही एक तासाचे पण नाही. फक्त एक पाईप फिटींग करायला ५५० रु. पे करता, एका जे.सी.बी. वाल्याला हे तरी गणित बसते का ते जरा मला सांगा. लेबलचा काहीतरी हिशोब असतो. तुमच्याकडे शेकडो पाईप बसवणार? बाहेर मार्केटला ५० रु. रेट आहे ना. तर तो तुमच्याकडून ३५ रु. घ्यायला पाहिजे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त साो.) :-**

साहेब आपल्याला पाईप बसवायचे मेजर काम येणार नाही. पावसाळ्याचा दिवशीच आपण बसवणार आहोत.

**मिलन म्हात्रे :-**

म्हणजे काय? तुम्ही मला सांगा की, हे तुमचे टेंडर आहे ना हे फिक्स असले पाहिजे. उद्या तो बोलेल मला १०००/- रु. पाहिजे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त साो.) :-**

साहेब ज्याठिकाणी आवश्यकता आहे. त्याचठिकाणी पाईप घेणार. प्रत्येक ठिकाणी थोडीच पाईप बसवणार आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही कधीही बसवा. पण पावसाळ्या अगोदर बसवाल ना. म्हणजे तुम्हांला १५-२० दिवसांत बसवायचे आहे. म्हणजे तुमचे एक टेंडर फिक्स झाले पाहिजे. १०० पाईप आणले ते फिट करायचे. हा एक विषय संपला. बर एक पाईप तर लागणार नाही. एका वेळेला तुम्ही ३-४ पाईप एकत्र लावता.

**शरद पाटील :-**

म्हणजे त्याची आवश्यकता किती? ते तुम्हांला माहित आहे.

**मिलन म्हात्रे :-**

एका पाईपला ५५० रु. लागत असतील तर चार पाईपला किती झाले? २२०० रु. झाले. नुसते लेबर पाईप जमिनित ढकलायचे ते पण वाकडे तिकडे लावतील. कसे लावतील. आपल्याकडे बरेचसे दिवे लावलेले आहेत ते मला माहित आहे मी तुम्हांला दाखवतो. मी स्वतः लावून घेतले. पाईप सरळ नसेल. उताराच्या वेळेला उलटा पाईप लागला तर पाणी पण जात नाही. हे ही तुम्हांला दाखवतो आणि स्पॉट वर नेवून आपण पंचनामा करायचा. फोटोग्राफ पण काढायचे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

ठेकेदाराला वाटाघाटीसाठी बोलवले होते.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब तुमचे परत वाटाघाटी आले.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

त्यांचे म्हणणे होते. डिजेलचे रेट वाढलेले आहे. आर.सी.सी. चे रेट वाढले. लोखंडाचे रेट वाढले. त्याच्यामुळे फक्त ह्या ठिकाणी......

**मिलन म्हात्रे :-**

सगळ्या गोलमटोल तक्ता करण्यात काही अडचण आहे. मला एक सांगा आमच्या साईड वरती ६०० रु. ८ तास जे.सी.बी. येतो. मार्केट रेट मग ७९५ रु. तुम्ही कुठच्या हिशोबाने घेता. त्या जे.सी.बीच्या रेटचे मी बोलतो. आमच्याकडे व्हाईट पेट्रोल टाकणार आहे का तो?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

साहेब नाही तो पाईप आणणार. आपण सांगणार त्या ठिकाणी वाहतूक करणार आणि बसवणार.

**मिलन म्हात्रे :-**

असू द्या.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

हा आपला मेजर कंम्प्युटर नाही.

**मिलन म्हात्रे :-**

जे.सी.बी. तुमच्याकडे सकाळी ९ वा. आला की, तुमचा रेट चालू ते रेट किती होतात? ८ तासाचे तुमचे जे काय तासाला तुमचे ६००, ७००, ८०० रु. पकडा. मला सांगा. तुमच्या साईडवर जे.सी.बी. गेल्यावर माझी जिकडे साईड आहे. तिकडे पोचल्यावर जे.सी.बी. चा रेट काउंट होतो. तो जे.सी.बी. तुमच्या मेन कार्यालयात येणार नाही. अहो ही टेंडर सिस्टिम आहे का? आणखीन पुढे बरीचशी तफावत आहे. पुढचे बोला ह्याच्यामध्ये ५५० रु. चा डिफरन्स आहे. पहिल्या ह्याच्यामध्ये एक फुट व्यासाचा ५५० रु. आहे. दोन फुटाचे सांगा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

महानगरपालिकेच्या एरियामध्ये ५ टक्के अबोव्ह.....

**मिलन म्हात्रे :-**

हे बघा. त्यांनी आपल्याला रेट दिला. मेहरबानी करुन सदस्यांना कन्फ्युज करु नका. त्यांनी रेट दिला. १४२२ रु. डी.एस.आर. चा रेट आहे. त्यानंतर ३०० रु. आहे. त्यानंतर ३०० रु. साहेब आपण किती परसेंट बोलला.

**शिवाजी बारकुंड :-**

१०१५ रेट दिले आणि त्याच्यावर ५ टक्के ॲड म्हणजे ते ५० रु. होतील. म्हणजे १०६५ रु. होतील. पाईपचे दोन फुटाचा रेट आहे ३२६४ रु.

**मिलन म्हात्रे :-**

म्हणजे किती झाले ५६८७. तुमचा एकूण डी.एस.आर. रेट किती आहे?

**शिवाजी बारकुंड :-**

दोन फुटाचा ना तर ३२६४ + ५ टक्के ॲड होतील.

**मिलन म्हात्रे :-**

किती झाले?

**शिवाजी बारकुंड :-**

१५० रु ॲड होतील.

**मा. सभापती :-**

म्हणजे ३४१४ रु.

**शिवाजी बारकुंड :-**

हो आणि तीन फुटाचा जो आहे.

**मिलन म्हात्रे :-**

त्याच्यात वाढीव किती झाले? २० रु.

**शिवाजी बारकुंड :-**

नाही १५० रु. वाढीव झाले. ३२६४ + १५० रु. म्हणजे पुढे मागे १, २ रु. होतील.

**मिलन म्हात्रे :-**

सगळे मिळून २५७३ रु. होतात आपण ४७३५ रु. दिले

**शिवाजी बारकुंड :-**

साहेब, ३२६४ रू + १५० रू. होतील. म्हणजे ३४००/- रू. होतील.

**मिलन म्हात्रे :-**

३४५० रू. पकडा. ठिक आहे आणि त्याची मुळ अमाउन्ट किती? ह्याच्यामध्ये निव्वळ हिशेब २२६७ रू. जास्त दाखवावेत. डी.सी.आर. रेट नुसार या सेकंड नंबर च्या पाईपवर आता ३ फुटाचे बोला.

**शिवाजी बारकुंड :-**

३ फुटाचे ९०० एम.एम. डायमिटरचा ६११४ रू. + ५ टक्के ॲड होतील त्याच्यावर म्हणजे ३०० रू. ॲड होतील.

**मा. सभापती :-**

म्हणजे ६४२० रू.

**शिवाजी बारकुंड :-**

६४०० रू. किंवा ६५०० रू. टोटल होतील. ६११४ + ५ टक्के

**मिलन म्हात्रे :-**

म्हणजे ५ टक्के ने किती वाढतील. ६४२० रू. झाले ना तुमचे ३६६५ रू. डी.सी.आर. रेट नुसार जास्त होतात. ह्या मिटींगला गर्व्हरमेंटच्या डी.सी.आर. रेटनुसार तुमचे जे वाहतुक, फिटींग वगैरे डी.सी.आर. चा रेट आहे त्याला आम्ही मान्यता देतो. अन्यथा माझा विरोध आहे. नाहीतर तुम्ही मतदान घ्या. मी विरोधात मतदान करणार. हा ठराव आम्ही पास करणार पण नियमानुसार डी.सी.आर. रेट तुम्ही चॅलेंज करू शकत नाही. तुम्ही असे म्हणा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

तुम्हाला जे.सी.बी. चे हे वाटते का?

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही हे जे सगळ दिलेले आहे ना. तुमच्या ह्या ॲज पर डी.सी.आर. ला आम्ही मंजुरी देतो. नाहीतर मी निवडणूक आयोगाकडे अपिल करणार.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

जे.सी.बी. चे रेट नाहीत ना. जे.सी.बी. चे रेट ठरवायचे आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही मार्केट रेट ठरवा ना.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

साहेब, मार्केट रेटनेच निविदा भरलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मग तुम्ही जे.सी.बी. चे ह्याच्यात मिक्स का केले?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

ठिक आहे. तुम्हाला कशावर ऑब्जेक्शन आहे?

**मिलन म्हात्रे :-**

पण किती डिफरन्स आहे?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

असु द्या ना आपण फक्त पाईप खरेदी करतो. महापालिकेचे......

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही मागचा जी.आर. काय आहे तो बघितलाना. त्याच्यात टर्म्स कंडीशन नुसार काय दिले आहे? ह्या कामाला मंजुरी देण्याकरिता ह्या अटीशर्ती टाकाव्यात त्या आपण वाचल्यात.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

वाचल्या ना.

**मिलन म्हात्रे :-**

मग, विषय संपला. डी.सी.आर. रेटनुसार काय असेल. त्याला आम्ही मंजुरी देतो. माझे तरी व्यक्तीगत असेल. बाकीच्यांना काय करायचे असेल ते करा. माझ्या मते डी.सी.आर. रेटनुसार पावणे तीन, अडीच तीन हजार जास्त रेट आहे. ते तुम्ही बघा. आणि डी.सी.आर. रेट लावा ना. वाटाघाटी कसल्या करता. वाटाघाटी करता म्हणजे तुमचे तुम्हाला रेट फिक्स नाही. की, काय रेट लावायचे ते. जर तुमचा व्यवस्थित रेट आहे. तुम्ही दाखवा की, हा डी.सी.आर. रेट आहे. त्यानंतर हे ५ टक्के अबाउ आहे. त्यानंतर ट्रान्सपोटेशन वगैरे काय असेल तर ते करा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो की, आता ह्यांनी सांगितले की, डी.सी.आर. रेटप्रमाणे आपण करूया. परंतु आपले जे सिटी इंजिनियर आहेत त्यांना विचारा की, डी.एस.आर. रेट आणि मार्केट मध्ये पाईपची जी ॲक्च्युअल कॉस्ट आहे त्या कॉस्ट मध्ये किती फरक आहे? तुम्ही ती इनक्वायरी केली का? कारण स्टील आणि सिमेंट चे भाव वाढलेले आहेत आणि डी.सी.आर. मध्ये कधी कधी जुना रेट असतो. तुम्ही ती इनक्वायरी केली का?

**मिलन म्हात्रे :-**

स्टील चे रेट उलटे कमी झाले.

**शिवाजी बारकुंड :-**

सन्मा. सदस्यांनी बोलल्याप्रमाणे मला हे विचारले डी.एस.आर. चे दर काय आहे? तर मी डी.सी.आर. चे दर......

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, तुम्ही सभागृहाला वस्तुस्थिती सांगितली पाहिजे. कारण कधी कधी डी.एस.आर. चे रेट हे जास्त ही होतात.

**शिवाजी बारकुंड :-**

आपण मला डी.एस.आर. चा दर विचारला होता. तर मी त्या डी.एस.आर. चे दर सांगितले. पण सध्या मार्केटची जी स्थिती आहे. सिमेंट आणि स्टील बद्दल सर्व सन्मा. सदस्यांना कल्पना आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, आता तुम्ही शहर अभियंत्याच्या महत्वाच्या पदावर आहात. एक सिमेंटचा पाईप खरेदी करणे, खड्डा मारणे आणि जे.सी.बी. ने तो आतमध्ये टाकणे ह्याला तुमच्या डी.सी.आर. रेटनुसार तुम्ही ५ टक्के अबाउ पकडून सुध्दा त्याच्यावर आणखिन किती जास्त त्याच्यावर एक्स्ट्रा पैसा खर्च होउ शकतो? ते सांगा ना. माझे म्हणणे काय आहे की, आपण जो एवढा डिफरन्स काढला तीन हजार रू. अडीच हजार रू. त्याच्यामध्ये आम्हाला तुमचे मत असे पाहिजे की, हे दोन हजार रू. नसुन त्याच्यामध्ये फार ते फार ५०० रू. आणखिन लावले तरी पुष्कळ आहे. म्हणजेच २०००/- रू. जास्त आहे. असे आम्हाला मत पाहिजे.

**शिवाजी बारकुंड :-**

साहेब, कॅल्क्युलेशन करायला पाहिजे. ह्याच्यासाठी तर तुम्हाला बोलवले.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आमचा नेहमी आरोप असतो आणि तुमचे आपआपसामध्ये नेहमी कोऑरडीनेशन नसते.

**शरद पाटील :-**

पालिका चालवणार कोण?

**मिलन म्हात्रे :-**

माझा असा आरोप आहे. तुम्ही सिटी इंजिनिअर नसून सुध्दा तुम्ही सिटी इंजिनिअर आहात.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, विषयांतर होते. तर बोला ना योग्य अंदाज सांगा.

**शिवाजी बारकुंड :-**

हे टेंडर कंम्पॅरिजन आमच्याकडे आलेच नाही. मागे काय रेट होते किंवा......

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, तुमच्याकडे नाही आले पण आता तरी सांगा.

**शिवाजी बारकुंड :-**

साहेब, आता मी डी.एस.आर. चे दर सांगितले आणि मार्केटची स्थिती म्हणजे डी.सी.आर. ला दर कमी असले तरी सिमेंट आणि स्टीलचा रेट जास्त झाल्यामुळे त्यांच्या किंमती जवळ जवळ वाढलेल्या आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

मातीचा भराव काढायचा आहे. मागच्या अधीच्या टेंडरमध्ये आपण बघू या. शहर अभियंताचे ओपिनियन का नाही मागितले?

**शरद पाटील :-**

आपण शांत बसुन पहिला का करत नाही? तुम्ही आज मिटींग बोलावलेय.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब मला एक सांगा की, तुम्ही उपायुक्त आहात. तुमच्या हाताखाली एस.आय. आहेत. हे लिगली कॉम्पीटन्ट ॲथोरिटी आहेत का? एखाद्या भरावाचे क्युबिक फुट काढणे. तुम्हाला ॲथोरिटी नाही. त्यांच्याकडे जी डिग्री आहे ती तुमच्याकडे आहे का? नाही. घेवारे साहेबांचा जो प्रकार चाललेला आहे तोच सेम प्रकार चाललेला आहे. त्यांच्याकडे सर्टीफिकेट बोगस आहेत. ते आपल्या शहराचे नियमन करत बसले. स्वतःकडे लायसन्स बोगस आहे. आणि ड्रायविंग करतात. अशातला भाग झाला आणि दुसऱ्याला लायसन्स मंजुर करून देतात.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

जर डी.एस.आर. रेट प्रमाणे एम.बी. रेकॉर्डींग करून जर ते करायचे असेल तर त्याचे एस्टीमेट साडे तीन कोटी रू. आले पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

आम्हाला ते समजावून सांगा ना. साहेब, चार कोटी रू. करा. ते तरी सांगा हा आंधळा हिशोब आहे. त्याच्यात दोन दोन हजार रूपये सर्व कट करून जास्त येतो. चार कोटी रू. येणार कुठून आम्हाला त्याचा अभ्यास पाहिजे.

**एस. ए. खान :-**

पानपट्टे साहेब, नेहमी असेच असते. माहिती गोळा करून येत नाही. येथे माहिती आणत नाही. आणि जेव्हा येथे आरग्युमेंटस होते. तेव्हा तुम्ही येथे सगळी माहिती आणता. तुम्ही सगळी माहिती घेवून का बसत नाही. नेहमीच असे असते.

**शरद पाटील :-**

त्यांनी जे बोलले तेच आहे ना. कोऑरडीनेशन आहे म्हणजे त्यांनी सांगितले ना की, मला माहितच नाही.

**एस. ए. खान :-**

मा. सभापती साहेब, तुम्ही मागच्या वेळेला पण सांगितले होते की, कोऑरडीनेशन करून यायला पाहिजे. तरी, ते मिटींगमध्ये येवून सांगतात की, मला ह्याची माहिती नाही. मला त्याची माहिती नाही. कसे काय चालणार आहे. महत्वाचा विषय आलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, आम्हाला तुम्हाला कुठे अडवायचे नाही.

**एस. ए. खान :-**

आपण आज मिटींग घेतली आणि त्यांच्याकडे माहिती नाही. अपुर्ण माहिती आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, तुम्ही पहिला निवडणूक आयोगाचे पत्र निट वाचा. मी तुम्हाला कुठेही घाबरवत नाही. माझ्या अक्कल बुद्धीला कळल ते मी पटलावर आणले. डी.एस.आर. रेटनुसार ज्या काही किंमती असतील त्या मंजुर करा. त्या अटीशर्तीवर आम्ही तुम्हाला मंजुरी देत आहोत.

**एस. ए. खान :-**

साहेब, खुलासा घ्या आणि त्यांच्याकडून माहिती मागवून घ्या.

**नयना म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, समजा आता आपण नाले साफसफाईचा विषय आणला. नाले साफसफाई तर होणारच आहे. पण नालेसफाई झाली त्याच्यानंतर ठेकेदाराने रोजच्या रोज त्या वॉर्डच्या नगरसेवकाची सही घेतली पाहिजे. नाही तर काय होईल तो चालवेल चार तास आणि तिकडे लिहणार आठ तास.

**एस. ए. खान :-**

साहेब, हे आता चालू होणार आहे ना तर आपल्याकडे जे इंजिनियर आहे.......

**नयना म्हात्रे :-**

त्यांच्यावर इंजिनियर लोकांचे बरोबर लक्ष पाहिजे.

**एस. ए. खान :-**

आणि त्यांनी कमीत कमी सुपरविजन करावे आणि दररोज काय होते तिथे गाळ निघतो त्याचे मोजमाप करावा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

नोडल ऑफिसर आहे त्यांनी संबंधित विभागातील इंजिनियर......

**एस. ए. खान :-**

पाणपट्टे साहेब, गाळ काढल्यानंतर, माती काढले तर ते उचलायला पाहिजे. तुम्ही तसेच ठेवता ना.......

**नयना म्हात्रे :-**

साहेब, नाहीतर ते एस.आय. काय करतात की, पावणे तीन तीन वाजले की पळून जातात, त्यांना नाले सफाई वगैरे काहीच माहित नाही. तसे होता कामा नये.

**एस. ए. खान :-**

आपल्या इंजिनियरला तिकडे नेमा.

**मा. सभापती :-**

हे कुठच्या वर्षाचे आहे?

**मिलन म्हात्रे :-**

हे २००७-०८ चा आहे आणि ते आपल्याला लागू आहे.

**मा. सभापती :-**

चला या विषयावर फार ५ % अबाउ डि.सी.आर. नुसार १० % आपण देवू.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब तसे नाही आपल्याला रूलिंग देताना डी.सी.आर. रेटनुसार, नियमानुसार त्यांनी जी अबाउ रक्कम द्यायची आहे. डी.सी.आर. रेट नुसार जे मार्केटला चालते, नियमानुसार आपण कशाला १० टक्के बोला त्याच्यात जर ८ टक्के असेल तर तुम्ही २ टक्के जास्त द्याल ह्या भानगडीत कशाला जाता?

**मा. सभापती :-**

आपण ५ टक्के पकडले ना.

**मिलन म्हात्रे :-**

कशासाठी. मी सुद्धा तेच बोलतो की, त्यांनी ५ टक्के पकडले ना. तर तुमच्या नियमात ७ टक्के होत असतील तर आपण १० टक्के कशाला बोला गरज काय आहे. तुम्ही नियमानुसार जी अमाउन्ट अबाउ रक्कम होते त्या रकमेला आम्ही मंजुरी देत आहोत ह्या याच्यात जरी कीतीही रक्कमा असुदे आणि आवश्यक बाब म्हणून आम्ही त्याला मंजुरी देत आहोत. डी.सी.आर. रेट चेक करावा आणि पुढच्या मिटींगमध्ये तो सादर करावा.

**शरद पाटील :-**

अटीशर्ती बद्दल काय झाले? तीन वर्षाचा अनुभव असायला पाहिजे. ह्या शहरामध्ये जर तीन वर्षाचा अनुभव नसेल तर दरवेळी दुसरे ठेकेदार येणारच नाही. हेच येणार.

**मिलन म्हात्रे :-**

असे आहे की, जर त्यांना अनुभव होता सन्मा. सदस्य प्रकाश ठाकुर येथे बसलेले आहेत तर गेल्या वर्षी आमच्या सगळ्यांची घर तीन तीन फुट आतमध्ये कशी गेली? अनुभव कुठला होता? इलेक्ट्रीकचे केबल जळले मिटर जळले, आग लागल्या आम्ही दोन दोन दिवस आमच्या घरात अंधारात होतो. मग अनुभव कुठचा त्या टेंबा हॉस्पिटलच्या इकडे मा. सुदामराव गायकवाड आयुक्त आहेत त्यांना घेवून गेलो तेव्हा आम्ही ७० गोणी त्या गटारामधल्या काढल्या. खांबित पण आमच्या बरोबर होते. त्यांना विचारा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

डी.सी.आर. रेटमध्ये किती जास्त आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

मी तुम्हाला निवडणूक आयोगाचे पत्र वाचून दाखवतो. दरवर्षी ज्या तंत्रज्ञानाचा वापर करून ज्या पद्धतीने कामे करण्यात येते. त्याच पद्धतीने करायचे.

**मिलन म्हात्रे :-**

म्हणजेच वाटाघाटी करायची.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

साहेब, नाही.

**मिलन म्हात्रे :-**

तंत्रज्ञान म्हणजे वाटाघाटी. पहिले वाटा आणि घाटी.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

त्या निविदेच्या अटीशर्ती आम्ही निवडणूक आयोगाकडे पाठवलेल्या आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

आम्ही कुठे नाही बोलतो. तुम्ही वाटाघाटी बोलला.....

**शरद पाटील :-**

मा. पाणपट्टे साहेब, काय लिहिले की, ज्या पद्धतीने काम होते त्या पद्धतीने काम झाले पाहिजे. त्याच्यात असे आहे ना. का, त्याच पद्धतीने करणार. जसे दरवर्षी बुडते तसेच बुडणार. हा त्यांचा उद्देश मग, तुम्ही त्यांना द्यायलाच नाही पाहिजे. पाणपट्टे साहेब, त्याचा अर्थ तसाच आहे ना.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

अटीशर्ती बद्दल....

**शरद पाटील :-**

तुम्ही अटीशर्ती बद्दल बोललात ना. म्हणजे तुम्ही त्यांना देतात. जसे काम चालू आहे तसे करा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुमचा निर्देश सांगा आणि फास्ट करा ना.

**मिलन म्हात्रे :-**

पाणपट्टे साहेब, आपण आता येथे बसला आहात. शहर अभियंता आलेले आहेत. जरा खालची लाईन वाचा पावसाळ्यापुर्वी रस्त्यावरील खड्डे बुजविणे इ. कामे परवानगी मागितलेली आहे. ते विषय का नाही आणलेत. आता दिवस राहिले किती? ह्या मिटींगमध्ये ते एकत्र सुद्धा घेतले असते तरी त्याला मंजुरी मिळाली असती. शहर भर खड्डे पडलेले आहेत.

**दिपक खांबित :-**

साहेब, मी शहरामध्ये सगळ्यांची पाहणी केली आणि जे टेंडर होते त्याला मंजुरी दिली.

**मिलन म्हात्रे :-**

आपण मला एक सांगा की, ह्याच्यात त्याने स्पष्ट दिलेले आहे.

**दिपक खांबित :-**

मा. आयुक्त साहेबांच्या मंजुरीने आहेत.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

पावसाळा सुरू व्हायला दहा दिवस राहीले. आता काय करणार? दहा दिवसात पाउस आला तर तुम्ही काय करणार?

**मा. सभापती :-**

तीन दिवसात रस्त्याचे कामे चालू करतील असे आपल्या अधिकाऱ्यांनी आश्वासन दिले आहे. ह्या डी.एस.आर. नुसार आपण आयुक्त साहेबांवर सोपवून देवू. डी.एस.आर. नुसार आपल्या आयुक्त साहेबांकडे वाढीव ५ टक्के अबाउ की, १० टक्के अबाउ सोपवून देउ.

**शरद पाटील :-**

पाणपट्टे साहेब, तुम्ही अटीशर्ती सांगा, तीन वर्षाचे काय होते ते तुम्ही सांगा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सोा.) :-**

दरवर्षी प्रमाणे देणार.

**शरद पाटील :-**

तुम्ही दरवर्षी प्रमाणे बुडवतात. त्याप्रमाणे घरे बुडाले की नाही. जिथे सफाई पाहिजे तिथे सफाई होत नाही.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

माझा पण स्वतःचा आरोप आहे. ठेकेदार काम करत नाही. पून्हा वेळेवर जे.सी.बी. भेटत नाही. आम्ही पालिकेमध्ये किती फोन करातो तरी आम्हाला टाईमावर जे.सी.बी. मिळते का? तुम्ही हे जे रेट दिले आहेत. पण टाईमावर जे.सी.बी. जागेवर नसते.

**मिलन म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, आपल्या पंपाचे जे शेड्युल दिले ना ते जरा सांगा पाण्याचा उपसा करण्याकरता ५ हॉर्स पॉवर, १० हॉर्स पॉवर आणि १५ हॉर्स पॉवर ठिक आहे. आम्हाला डी.एस.आर. सांगा.

**शरद पाटील :-**

ह्या अटीशर्ती काही क्लिअर करा ना.

**मिलन म्हात्रे :-**

सन्मा. सदस्य शरद पाटील साहेब, ते ॲग्रीमेंटमध्ये येणार. पहिले अमाउन्ट घेउ. पहिले डी.एस.आर. रेट बघाना. पंपाचा द्या. मा. सभापती साहेब, डी.एस.आर. रेटला ५ हॉर्स पावर २५० रू. ह्यांनी लावलेला आहे. डी.एस.आर. मध्ये ५० रू. आहे. म्हणजे २०० रू. नुसते पंपाचे भाडे. ५० रू. च्या ऐवजी २५० रू. लावले. ९० रू. च्या वर जाउ शकत नाही.

**मा. सभापती :-**

आपण त्याला हे करून टाकू. आपल्या नगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना सांगु की, आपणच स्वतः पंप आणू आणि स्वतः पाणी काढावे. कोणाला कॉन्ट्रॅक्ट द्यायची गरज नाही.

**मिलन म्हात्रे :-**

जरी कोणाला कॉन्ट्रॅक्ट द्यायचे असेल तर डी.एस.आर. रेटनुसार द्या ना.

**मा. सभापती :-**

हे पंप नविन येतील. २०-२० हजार रू. ला, २५-२५ हजार रू. ला नविन येतील.

**मिलन म्हात्रे :-**

तुमचे स्वतःचे पण होतील.

**मा. सभापती :-**

हो आणि वर्षभर चालतील. किंमतच तेवढी आहे. आणि एका तासाचे आणि एका दिवसाचे ऐवढे पैसे भरायचे कुठून? बंद आहे ना. आपलेच पंप लावा. दहा पंप आणा....

**नयना म्हात्रे :-**

पाणपट्टे साहेब, आपल्याकडे जे.सी.बी. किती आहेत?

**एस. ए. खान :-**

दोन जे.सी.बी. आहेत.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सोा.) :-**

पोकलन १ आहे. २ जे.सी.बी. आहेत.

**नयना म्हात्रे :-**

२ जे.सी.बी. आहेत. तर, जरा तुमच्या अधिकाऱ्यांना सांगा की, जे.सी.बी. किती आहेत ते उत्तर द्या.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

आपल्याकडे २ जे.सी.बी. आहेत.

**नयना म्हात्रे :-**

आपल्याकडे २ जे.सी.बी. आहेत ना. त्याच्यात चालू कीती आहेत. ते विचारा.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

दोन्ही जे.सी.बी. चालू आहेत.

**नयना म्हात्रे :-**

नाही. एकच जे.सी.बी. चालू आहे. जर ती भंगार झाली असेल तर ती विकून टाका. साहेब, किती वर्षापासुन, किती महिन्यापासून १ जे.सी.बी. चालू आहे. मी खोट बोलत असेल तर तुम्ही विचारा असे चालते का? आम्ही कधी जे.सी.बी. मागितला तर सांगतात की इकडे गेला तिकडे गेला. मग, आमच्या वॉर्डची कामे कशी होणार संदिप शिंदे साहेबांना सांगितले तरी ते इकडे पाठवतात.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

रामदेव पार्कला, क्वीन्स पार्कला आणि महेश इंडस्ट्रीला पाणी साचते, त्याच्यामुळे जे.सी.बी. तिथे असतात.

**नयना म्हात्रे :-**

बरोबर आहे. प्रत्येक ७९ वॉर्डमध्ये काम आहे. नाही असे नाही. पण जे.सी.बी. २ आहे तर तुम्ही कुठे कुठे देणार?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

तुम्हाला आता जे.सी.बी. देवू. जेव्हा तुम्हाला नाले साफ सफाई करायचे असेल तेव्हा आम्ही तुम्हाला जे.सी.बी. देवू.

**नयना म्हात्रे :-**

ते तर मी मागवणार. पण आपल्याकडे २ जे.सी.बी. आहेत ना. ती १ जे.सी.बी. रिपेरिंग कधी करायची.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

रिपेरिंग झाली ना. दोन्ही जे.सी.बी. कामावर आहे.

**नयना म्हात्रे :-**

नाही. एकच जे.सी.बी. होती.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

पाणपट्टे साहेब, चार दिवस झाले मी कांबळे साहेबांना फोन करते. कांबळे साहेबांचा फोन बंद आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

दोन दिवसापासून मी स्वतः रामदेव पार्कला, क्विन्स पार्कला जे.सी.बी. घेउन होतो.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

एक दिवस जे.सी.बी. पाठवले. ऑईल पडत होते. म्हणून लगेच रिटन गेली. काम तर झालेच नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

मी काल जे.सी.बी. घेउनच मी रामदेव पार्क येथे होतो.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

साहेब, तुमच्या ज्या जे.सी.बी. आहेत ते नादुरूस्त आहेत. त्या पहिला दुरूस्त करा.

**एस. ए. खान :-**

मनपा क्षेत्रातील कच्चे पक्के नाले सफाई/खोदाई करणे, गाळ उपसणे तसेच खाडीचे पात्र रुंद करणे, गाळ वाहतुक करणेकामी अ) जे.सी.बी. मशीन, बोटपोकलन मशीन व पोकलन मशीन भाड्याने पुरवठा करणे ब) पक्के नाले मजूरांमार्फत साफ करणे, गाळ माती डंपरमार्फत मानपाचे मालकी जागेत वाहतुक करणे, क) रोड क्रॉसिंगमध्ये आर.सी.सी. पाईप खरेदी करुन बसविणे व साचलेल्या पाण्याचा उपसा करणेकामी सक्शन पंप भाड्याने घेणे आदी विविध कामाच्या जाहिर निविदा प्रसिध्द करुन दर मागविण्यात आले होते. संबंधित निविदाकारांनी सादर केलेले कमी दर हे जादा असल्याने त्यांना दि. १३/०५/२००८ रोजी वाटाघाटीस बोलावून त्यांनी मान्य केलेले खालील डी.एस.आर. रेट नुसार असणाऱ्या दरास ही सभा मान्यता देत आहे.

**अ) जे.सी.बी./पोकलन/बोटपोकलन मशीन पुरवठा करणे :-** १) मे. आशापुरा कन्स्ट्रक्शन यांनी गट क्र. ०१,०२,०३ व ०८ गटाकरिता २) मे. गणेश अर्थ मुव्हींग यांनी गट क्र. ०४, ०५, ०६, व ०७ करीता भाड्याने जे.सी.बी. मशिन रु. ७५८/- प्रती तास, बोटीसह पोकलन मशिन रु. १,४११/- प्रती तास व पोकलन मशिन रु. १,४११/- प्रती तास याप्रमाणे.

**ब) मजूर व डंपर पुरवठा करणे :-** १) मे. बैज्यु कंन्स्ट्रक्शन गट क्र.०१, २) मे. गणेश अर्थ मुव्हींग गट क्र.०२ व ०६ ३) मे. संकल्प ट्रेडींग गट क्र.०३,०५,०७ व ०८ ४) मे. सिध्दीविनायक अर्थ मुव्हर्स गट क्र.०४ करिता प्रती मजूर साहित्यासह रु. १५९/- व प्रती डंपर रु. १,७००/- प्रतीदिन याप्रमाणे.

**क) सक्शन पंप व आर.सी.सी. पाईप पुरवठा करणे :-** मे मनोहर ट्रेडींग कंपनी यांनी मागील वर्षीच्या मंजूर दरात पेट्रोल, डिझेल, ऑपरेटरसह म्हणजेच ५ हॉर्स पॉवर सक्शन पंप करिता रु. २५०/-, १० हॉर्स पॉवर सक्शन पंप करीता रु. ३००/- व १५ हॉर्स पॉवर सक्शन पंप करिता रु. ३२५/- प्रती तास याप्रमाणे.

**२) आर.सी.सी. NP-३ पाईप पुरवठा कामी** मे. गणेश डेव्हलपर्स यांनी निविदेत सादर केलेले सर्वात कमी दर म्हणजेच १ फुट व्यासाचे करीता रु. २,४३७/-, २ फुट व्यासाचे करिता रु. ५,६८७/- व ३ फुट व्यासाचे करीता रु. १०,०७५/- याप्रमाणे.

उक्त नाले सफाई कामाच्या दरास डी.एस.आर. च्या १० टक्के वाढीव किंवा नियमानुसार दराप्रमाणे वरील पाईप खरेदी करावी व दक्षता पथकासाठी मा. स्थायी समिती सदस्यांना घेणेत यावे व जादा मजूर मंजूर दरात घ्यावे.

तरी वरील निविदाधारकांनी / ठेकेदारांनी या कामास नकार दिल्यास मा. आयुक्तांनी त्यांच्यावर फौजदारी स्वरुपाची कारवाई करावी करीता ही सभा मान्यता देत असून येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

**शानु गोहिल :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**शरद पाटील :-**

मा. सभापती साहेब, हा जो मा. महासभेचा ठराव आहे. तर त्या ठरावावर मा. महापौर साहेबांची सही झाले का? आपण ज्या निविदा मागितल्या. त्या ठरावावर सही झाले का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

होईल ना.

**शरद पाटील :-**

सही झाले का नाही ते सांगा. होईल म्हणून बोलू नका.

**मिलन म्हात्रे :-**

ते तुम्ही सचिवांना विचारा कारण ते कार्यालय सचिवांचे आहे.

**नगरसचिव :-**

सही झालेली आहे.

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेबांची सही झालेली आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, ह्याच्यामध्ये एक दुरूस्ती अशी करा की, आता आपण ४५ डेझचे टेंडर मागवले आणि ४५ दिवसानंतर सुद्धा पाउस जास्त पडते. मग जेव्हा आपल्याकडे माणस नसतात मग आपल्याला आपल्याच वार्डमधले माणस आणतात. मग त्यावेळेला त्यांचे काही स्पेशल ॲग्रीमेंट करायला सांगा.

**मा. सभापती :-**

जिथे पाण्याचा पुरवठा झाला असेल तर ताबडतोब स्पेशल ॲग्रीमेंट करून द्यावी.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ती माणस कंटीन्यु करा. १५-२० माणस आहेत. भाईंदर वेस्टला १५ माणस ईस्टला १५ माणस मिरा रोड ला १५ माणस असे वेगवेगळे माणस तुम्ही ठेवा.

**शरद पाटील :-**

सचिवांनी सांगितले की सही दिले म्हणून. पण सही दिली नाही. मा. महापौर साहेबांची सही झाले का? कारण आता नाही म्हणून सांगितले. मा. महापौर साहेबांनी सांगितले जो ठराव दिला त्या ठरावाप्रमाणे कार्यवाही होईल ना. ट्रकचे भाडे नाही. पण ट्रकचा विषय नाही आणि डी.एस.आर. प्रमाणे आहे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

ठराव इकडे आहे का?

**प्रशांत पालांडे :-**

सन्मा. सदस्य एस.ए. खान साहेब, तुम्ही रेटला मंजुरी दिली की काय केले?

**शरद पाटील :-**

डी.एस.आर. प्रमाणे आहे.

**एस. ए. खान :-**

डी.एस.आर. प्रमाणे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

नगरसचिव साहेब, तुम्ही मगाशी जे निवेदन केले. ते खोटे आहे. मा. महापौर साहेबांनी अजुनपर्यंत त्यांच्या स्वाक्षरीचा ठराव तुमच्याकडे दिलेला नाही. पाणपट्टे साहेबांचे सुद्धा झालेला नाही.

**नगरसचिव :-**

सही केलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

सही असेल तर पाणपट्टे साहेब पहिला ठराव ठेवा.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

आम्ही पाणपट्टे साहेबांना विचारले तर त्यांनी हो म्हटले होते.

**मिलन म्हात्रे :-**

मला आता महापौर साहेबांचा फोन होता.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

मला सुद्धा महापौर साहेबांचा फोन होता.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर साहेबांनी सांगितले की, ठराव दिलेला नाही. ठरावामध्ये १६०० रू. ट्रकचा रेट आहे. तर तुम्ही किती ३२०० रू. दिला आहे. मला आता मा. महापौर साहेबांचा फोन होता. ठराव घेवून या.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

मी खुलासा करतो.

**मिलन म्हात्रे :-**

कसले खुलासे करता. इकडे पहिले ठराव द्या.

**शरद पाटील :-**

१६०० रू. प्रमाणे आपण ट्रकचे भाडे नक्की केले आणि ३२०० रू. प्रमाणे चालले. म्हणजे काय आहे? मा. महासभेने दिलेल्या ठरावाला तुम्ही मंजुरी करत नाही.....

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब सांगतात की, माझी सही झाली नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

ते वॉर्ड साफ सफाई बद्दल बोलतात. नाले सफाई बद्दल बोलत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

कुठला? ज्या दिवशी तुमचे डंपरचे भाडे नक्की होते. नालेसफाईला निराळ भाडे, इकडे निराळे भाडे, तिकडे निराळे भाडे असे हाते का? तो पंप तुम्ही घेणार. तुमचे जे भाडे नक्की होते. ते तुम्ही कुठे ही लावाना. खाडीवर लावा नाल्यावर लावा, गटारावर लावा, कुठेही लावा. जे.सी.बी. घेणार ते असे आहे का की, नाल्यातला गाळ काढायला हजार रू. गटारावरती माती उचलायला ५०० रू. आणि माती ढकलायला ४०० रू. असे आहे का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

डंपरचा रेट कसा असतो की, माती जे.सी.बी. टाकते ज्या ठिकाणी वॉर्ड साफसफाई मध्ये माणस असेल त्याच्यावर...

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब, असे आहे की, आपण जे.सी.बी. ने जो गाळ काढतो ना तो एकदम पातळ असतो आणि चिखल असतो त्याच्यामुळे कुठलाही डंपर येत नाही. त्यामुळे डंपरचे रेट जास्त असतात. त्याच्यामध्ये अजिबात येत नाही.

**शरद पाटील :-**

सन्मा. सदस्य खान साहेब, डी.एस.आर. प्रमाणे ठरावाचे किती टक्के आहे? १० टक्के आहे हो.

**मिलन म्हात्रे :-**

सन्मा. सदस्य म्हात्रे साहेब, तुमच्या घरी जायचा रस्ता आझाद नगर मधून निघाला तो पावसाळ्यामध्ये तरी साफ झाला होता का? किती टू व्हिलर वाले, किती थ्री व्हिलर वाले पडले. एक्सीडंट केवढे झाले. तिथे भिती वाटायची.

**शरद पाटील :-**

सन्मा. सदस्य म्हात्रे साहेब, चार वर्षापुर्वी आपण कांबळे साहेबांना तिथे घेवून गेलो होतो. तिथे काय झाले?

**मिलन म्हात्रे :-**

ह्या अगोदर झाले ते झाले. नगरपरिषदेची ग्रामपंचायत झाली. महापालिकेची पण पाच वर्ष ग्रामपंचायत सारखी चालली. सुधरवायचा प्रयत्न करा. तुम्ही आणि मी कायदे बनवत नाही. ऑलरेडी कायदे आहेतच. आपण थोडे टाईट पकडत नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

आम्ही कामे करतो.

**शरद पाटील :-**

पाणपट्टे साहेब, आम्ही कामाला विरोध करत नाही. आम्ही कशालाच विरोध करत नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

साहेब, मी सचिवांना पत्र दिले आहे. ज्या दिवशी ठराव झाला त्यादिवशी पत्र दिले.

**शरद पाटील :-**

तुम्ही आता तिन वर्षाचा अनुभव सांगता. त्यांना ती कामे द्यायची म्हणजे जसे डुबते त्यांनाच कामे द्यायची. ती डुबवतात तर त्यांनाच कामे द्यायची का? तुम्ही सगळ बोलता ते प्रॅक्टीकली बोलता बरोबर बोलता. मग येथे येताना अडकता कशाला? तुम्ही बोलता तुम्हाला अनुभव आहे सगळ आहे. आता त्यांना विचारले की, तुमच्या कडे तसे काही प्लानिंग आहे का? सन्मा. सदस्य म्हात्रे साहेब, तुम्ही आता आलात. ह्याच्या अगोदर आम्ही ह्यांना विचारले होते की, तुमच्याकडे ह्याचे काही प्लानिंग आहे का? ते आहे बोलतात पण ते कुठे आहे ते दाखवत नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

साहेब, दाखवतो ना.

**शरद पाटील :-**

कधी दाखवता? तुम्हाला कधी विचारले होते ते सांगा? मग का नाही दाखवले? प्लानिंग दाखवा ना काय कुठे आहे?

**एस. ए. खान :-**

पाणपट्टे साहेब, आता जे काम होणार आहे ना. त्याच्यावर कोणत्या इंजिनियरची तुम्ही नेमणूक करणार आहे. त्याची पण आम्हाला माहिती द्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

भाईंदर वेस्टला पाणी भरते. बरोबर आहे. भाईंदरचे पाणी जाते कुठे? तुम्हाला माहिती पाहिजे की, भाईंदर ईस्टचे पाणी आणि भाईंदर वेस्टचे पाणी जाफरी खाडीमध्ये जाते. आणि त्याचा जो नाला आहे ना तो एवढासा आहे. तर त्याला जास्त डीप करा. साहेब, वसई – विरार बघा ती पण नगरपालिका आहे तिथे किती चांगले काम चालू आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील मी ह्यांना काय म्हटले की, तुम्ही तिथे जावून बघुन या. मी तुम्हाला परत सांगतो की, घोडबंदर पासुन ते भाईंदर पर्यंत किती खाडी आहे? भाईंदर (पुर्व) ते घोडबंदर मोर्वे पर्यंत किती खाडी आहे? मी तुम्हाला इथे बसुन सांगतो. परंतु, पाणी भरायचे कारण मी तुम्हाला सांगतो. आर. डी. शिंदे साहेब, आलेले नाही. दोनदा तीनदा आलेले त्यांच्यामुळे हे पाणी भरायला लागले. पंढरपूर, सोलापूर, कोल्हापूर, तुळजापुर, येथे पहिला पुर यायचे भाईंदरमध्ये कधी आयुष्यात पुर नव्हता. आम्ही इथलेच आहोत. आम्ही या गावातच वाढलो. आम्हाला अनुभव आहे. पण हे नविन अधिकारी आले आणि जिथे नाले नव्हते ना सरकारी नाले बंद करून टाकले आणि नविन नविन नाले खोदले. म्हणजे जे पाणी घोडबंदर वरून भाईंदरला यायचे तो आता भाईंदर वरून घोडबंदरला पाणी चालले आणि घोडबंदरचे पाणी मिरा रोडला चालले.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, हे तीन ठराव आहेत.

**नगरसचिव :-**

एक ठराव आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, बाजुला बसले त्यांना बोलवा ना. नेमके काय आहे ते बघा. त्यांचे म्हणणे आहे की, मी सही दिलेली नाही.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

साहेब, तुम्ही जर बोलवले तर ते येतील.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

प्रोटोकॉल मध्ये येणार नाहीत.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर साहेबांना बोलावून घ्या. कसे काय ते प्रोटोकॉलमध्ये येणार नाही. मा. आयुक्त साहेब आलेले चालतात. साहेब आम्हाला प्रोटोकॉलमध्ये लिहून द्या. ते महापौर साहेब आहेत तुम्ही असे कसे बोलता.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

आपण त्यांच्याकडे जाउ.

**मिलन म्हात्रे :-**

कशासाठी? ही स्थायी समिती आहे. ही मिटींग आहे म्हणून मी बोलतो. नाहीतर मी स्वतः गेलो असतो. ह्या मिटींगमध्ये चर्चा आहे. आपण सुपारीच्या दुकानावर नाही.

**मा. सभापती :-**

सचिवांनी सांगितले की, ठरावावर साईन झालेली आहे. मिटींग संपली असे मी जाहिर करतो.

**मिलन म्हात्रे :-**

मिटींग संपली कशी? तुमचा ठराव काय बोलतो? सन्मा. सदस्य खान साहेबांनी ठराव मांडला. त्याच्यामध्ये दि. १३/०५/२००८ मिटींग सुरू झाले ते माहे का बघा. ती मिटींग तुम्ही विखंडीत केली. तुमच्या ठरावामध्ये डी.एस.आर. रेट सगळ पाहिजे. तो उल्लेख ह्याच्यामध्ये नाही. मान्य केलेले खालील दर डी.एस.आर. रेटनुसार व्हावे. सचिवांनी ठराव वाचला पाहिजे कायम केला पाहिजे. लगेच उद्यापासुन इम्पलिमेंटेशन होईल.

**मा. सभापती :-**

आता पासुनच इंम्पलिमेंटेशन होईल.

**मिलन म्हात्रे :-**

ते वाचल्याशिवाय होणार नाही.

**एस. ए. खान :-**

इंजिनियर लोकांची नेमणूक करणार आहे. त्याची माहिती द्या की, कोण कोण इंजिनियर कुठे कुठे असणार आहे आणि गाळ जे काढणार, माती काढली तर ते दुसऱ्या दिवशी उचलायला पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

विषय संक्षिप्त असला पाहिजे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

साहेब, उद्या आम्हाला ऑडीटला प्रॉब्लेम होईल.

**मिलन म्हात्रे :-**

ह्या शहराचे तुम्ही काय ऑपरेशन करता ते आम्हाला माहित आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

मला ह्याच्यावर पहिला खुलासा करू द्या ना.

**मिलन म्हात्रे :-**

बोला.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

डी.सी.आर., जे.सी.बी. पोकलन आमच्याकडे नाही. पाईपला आहे. पाईपचे रेट आहे. त्याप्रमाणे आपण खाली वाक्य दिलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

जे ॲप्लीकेबल नाही ते काय ॲप्लीकेबल असेल ते मला माहित आहे. तुम्ही करा आम्ही ठराव पास करतो ना. तुम्हाला काय वाटते की, तुम्हालाच सगळ माहित आहे. तुम्ही प्रत्येक किंमत घेणाऱ्याला त्याला व्हॅल्युएशन अधिकारी असतो. तुम्ही कोणाला सांगता. उद्या जे.सी.बी. चा रेट तुम्ही चार हजार रू. लावला. मग, आम्ही मान्य करायचा का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

लावला नाही.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही दोन दोन हजार रूपये जास्त लावले. तुम्ही दुसऱ्या नविन नगरसेवकांना सांगायचे मला सांगायचे नाही. तुम्ही जे असात तिकडे वाचतो म्हणून आता सुचना देणार. नंतर काय होणार सचिवांचे ते वाचन चालले सचिव साहेब, डी.एस.आर. रेट नुसार मंजुरी देणे असे तुम्ही लिहा ते विषयामध्ये लिहायचे.

**ज्योत्स्ना हसनाळे :-**

वाक्य रचना जुळेल ना.

**मिलन म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, माझे ह्याच्यात कुठलेही कोणाला व्यक्तीगत आकस नाही. हे जे काम चालले ते थोडे तुमच्या अंगाशी येईल त्यावेळेला कळेल. तुम्ही डी.एस.आर. रेट नुसार लिहा आणि वाचन सुरू करा. चोरी काय आहे. तुम्ही डी.एस.आर.रेटनुसार लिहा आणि वाचन सुरू करा. चोरी काय आहे? तुम्ही डी.एस.आर. रेटचे बंधन टाकता. मग विषय पत्रिकेत टाकायला काय झाले. त्यात तुम्ही म्हणा. जर डी.एस.आर. मध्ये जे.सी.बी मशिन नसेल तर विषय संपला. जे.सि.बी. मशिन जो कोणी ऑथेन्टिगेट करेल ना. ६००, ७००, ८०० कोण करेल? विषय पत्रिकेमध्ये लिहा. सुचना कशी येणार ठरावामध्ये येणार. तुम्ही ठरावाचे वाचन करता. वाटेल तसे तुम्ही ठराव आणाल काही कराल. रेट काही द्याल कोणाचा विचार नाही. पण मी सांगतो की हे रेट तुम्ही काढले. हे कोणी काढले? साहेब कुठली ॲथोरीटी आहे ते करायला सांगा त्याला

आम्ही मान्यता द्यायची. ऑथॅान्टिगेट आता बोलवला. सिटी इंजिनियर आम्हांला माहित आहे. तुम्हांला माहित आहे की सिटी इंजिनियरच्या पॉवर्स काय आहे? सिव्हील इंजिनियरचं पुस्तक घेवून बसा मग तुम्हांला कळेल. त्या मनुभाईच्या मॅटरमध्ये घेणारे साहेबांना पॉवरर्स नसताना सगळी टेंडर वगैरे काढली. नगररचनेच्या एम.आर.टी.पी. चे पूर्ण पुस्तक वाचा. त्यात कुठे टाउन प्लॉनरला किंवा ए.डी.टी.पी. ला कुठेही पॉवरर्स नाही. टेंडरर्स वगैरे काढायचे. काय वाटेल ते करतात. ह्याच्यामध्ये वाहतुक करणे कुठे? खाजगी बिल्डरच्या फ्लॅट वर तुम्ही साईड कुठे टाकणार? ते मेंन्शन करा त्या ठरावानुसार तुमचे ठेकेदार बिल्डर लोकांना माती विकतात विकलेले आहे. तुम्हांला साईड टाकायला काय प्रॅाब्लेम होतो का? तुम्ही महापालिकेची मालमत्ता सुभाषचंद्र बोस मैदान त्याच्यानंतर तुमचा पार्कीग चा जो प्लॉट आहे ते लिहा तिकडे त्या ठेकेदाराने टाकले पाहिजे. काय वाटेल तुम्ही करुन ठराव इकडे मंजूरीला आणाल का? ते लिहायला तुम्हांला अडचण आहे का? माती कुठे टाकणार? वाहतुक करणे म्हणजे कुठे? ह्या नाल्यातुन त्या नाल्यात त्या नाल्यातून त्या नाल्यात, इकडून तिकडे टाकायची.परत तिकडून उचलायची इकडे टाकायची.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त साो.) :-**

मनपाच्या मालकीची आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तसे लिहा मनपाची मालकी सुभाषचंद्र बोस मैदान आहे.आपल्याला तिकडे भराव करायला आहे. तुमचे ते पार्कीग चे कुठे आहे. घोडबंदरला ट्रक टर्मिनलला असे व्यवस्थित टाका ना.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त साो.) :-**

साहेब आले ते एक शब्दामध्ये ते सगळं आले जिथे जवळ पडेल त्या ठिकाणी टाकणार आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आणि नसेल तर.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त साो.) :-**

आहे ना.

**मिलन म्हात्रे :-**

कुठे आहे?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त साो.) :-**

ट्रक टर्मिनलचे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तसे टाका ना.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त साो.) :-**

आहे ते शब्द आहे.

**मिलन म्हात्रे :-**

भाईंदर पश्चिमेला आमचे सुभाषचंद्र बोस मैदान आहे. एक वर्ष भरणी करा. कमी पडणार नाही. उक्त नाले सफाई कामाच्या डी.एस.आर. नुसार येणाऱ्या खर्चाच्या दरास असे पाहिजे. तुमचे फायनल बिलिंग होईल. ते डी.एस.आर. चे रेट पकडुन होणार आहे.

**मा. सभापती :-**

जर त्यांना उद्या मान्य नाही झाले तर ते बंद करायचे?

**मिलन म्हात्रे :-**

कोणाला व का?

**मा. सभापती :-**

ठेकेदारांना?

**मिलन म्हात्रे :-**

त्यांनी निविदा भरलेल्या आहेत. मान्य नाही म्हणजे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त साो.) :-**

त्यांनी रेट दिलेले आहे आणि त्यांनी जर उद्या म्हटले की....

**मिलन म्हात्रे :-**

त्यांचे टेंडर टर्मिनेट करा ना मान्य नाही झाले म्हणजे काय भाईगिरी आहे का? तुमच्या निविदा करताना फॉर्म कशासाठी घेता. सदर काम मला मंजूर आहे हे मी करीन. हे त्याच्यामध्ये शब्द आहे. तुम्ही करा नाहीतर मी करतो. तुम्ही टेंडर फॉर्ममध्ये अटीशर्ती काय दिलेल्या असता ठेकेदाराने तुमच्या ऑफीसच्या बाहेर दादागिरी करायच्या भाईगिरी करायची आणि परत ही दादागिरी करायची.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त साो.) :-**

कोणी दादागिरी केली नाही. पोलिस ठेवले होते. माझ्याकडे एक तक्रार ही आली नाही...

**मिलन म्हात्रे :-**

तुमच्याकडे कशाला? तुम्हीच सांगता हे करा म्हणून कोण ठेकेदार बोलतो काम नाही करणार? तुम्ही त्याच्याकडून लेखी घ्या मग आम्ही त्यांना कामधंद्याना लावतो. सगळी मजा करावात. मिठीनदीच प्रकरण काय आहे. माहित आहे ना. माझ्याकडे कोर्टाचे नियम, कायदे कानून सगळे. आहे आम्ही अजूनपर्यंत बोलत नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

कामाला डिले नको म्हणून मी बोलतो.

**मिलन म्हात्रे :-**

मी पण बोलतो. हे जे सगळं आहे ना. हे कामाला डिले डिले करतात तुम्ही एवढ्या चुका नाही पाहिजे. ही तुमची परमिशन कधी आली आणि मिटींग आता का लागली. २२ एप्रिल त्या तुम्हांला परमिशन मिळाले. १७/०४/०८ चा अर्ज आहे. आणि मिटींग लागते आज आज तारिख किती आहे? एवढा वेळ गेला कशाला? निविदेच तुम्हाला कशाला पाहिजे? तुम्ही एक आठवडा पकडा. हे बघा २२ एप्रिल नंतर एक आठवडा पकडा. तुम्ही तुमच्या सगळ्या प्रोसिजर अरजन्सी बोलता ना. सगळ्या तुमच्या प्रोसिजर उरकुन घ्या ह्यासाठी एक आठवडा पुष्कळ झाला. एवढा लेट प्रशासनाच्या वतीने जवळ जवळ २२ एप्रिलमध्ये ३० एप्रिलला फायनल काम होवून १ मे सुट्टी २ मे ला मिटींग लागली पाहिजे होती. साहेब तुम्ही काय सांगता. तसे नसते, असे नसते अस नाही तसं नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

साहेब मध्ये सुट्ट्या होत्या.

**मिलन म्हात्रे :-**

असू द्या ना. २ मे ला सुट्टी होती का? त्यानंतर तुम्ही मिटींग लावायला पाहिजे होती. तुम्हाला १८ दिवस लवकर मिळाले असते. आमचे काय जाते?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

तुम्हांला डेट सांगतो ना. कसे आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

एक सिंम्पल थिंग आहे. निवडणुक आयोगांनी तुम्हाला २२ एप्रिलला तुम्हांला मंजूरी दिली. मग तुमचे १८ दिवस का गेले. तेवढे मला सांगा. तुमचं सगळं सोडून म्हणजे तुमची प्रोसिजर सोडून ३० एप्रिल पर्यंत तुमची सगळी प्रोसिजर चला ८ दिवस, ९ दिवस तुम्हांला दिले. तुम्ही कसल्या इमरजन्सीच्या गोष्टी करता त्या अधिका-याच्या केबिनला कोण नसेल सगळी धर्मशाळा करता. त्या अधिका-याच्या केबिनला कोण नसतो. सगळी धर्मशाळा झाले. निवडणुकीच्या नावाखाली सगळे मजा मारत फिरतात. गप्पा मारतात. १०टक्के वाढीव किंवा नियमानुसार असे लिहा. उद्या जर ७टक्के, ८टक्के असेल तर आम्ही २टक्के ची जिम्मेदार कशाला? जो कोण ठेकेदार मनाई करेल. त्याच्यावर फौजदारी स्वरुपाची कारवाई आयुक्त साहेबांनी करायची. असे त्याच्यात लिहा.

**मा. सभापती :-**

ठेका दिला कोणी तर बघायचे.

**मिलन म्हात्रे :-**

ते बोलले ना, कामाला मनाई केली तर साहेब ही मंजूरी आहे. तुम्ही आहात कुठे? ठराव काय आहे तो वाचला का? विषय काय आहे माहित आहे का? ठेके दिलेले आहे. त्याच्यात वाटाघाटी झाली अमाउंट फिक्स झाली. त्यांनतर हे आढळून आले. हे डि.एस.आर. रेटनुसार नाही. ते स्वतः बोलतात की ठेकेदार ने मनाई केली तर तर मग आतमध्ये घालायचे आणि दोन दोन फटके द्यायचे. दक्षता पथकामध्ये स्थायी समितीचे सर्व सदस्य असतील. मागच्या वेळेला जेव्हा बावस्कर साहेब होते. त्यावेळेला आपण करायचो. स्थायी समितीच्या सदस्यांचे एक रजिस्टर बनले पाहिजे. त्याच्यामध्ये कुठल्या ठेकेदाराने कुठले काम केले. कुठल्याही वॉर्डमध्ये कुठल्याही दोन दोन नगरसेवकांना तुम्ही पाठवा. आम्ही म्हणत नाही की माझ्या वॉर्डामध्ये मीच जाणार. माझ्या वॉर्डामध्ये तुम्ही पण या चालेल. खान साहेब आले तरी चालतील. खान साहेबांच्या वॉर्डमध्ये मी गेलो तरी चालेल. प्रत्येक पक्षाचा तुम्ही एक – एक प्रतिनिधी घ्या विषय संपला. आले ठिक नाही आले ठिक आणि लेजर ठेवायचे. कामसुर्ती साईड बघायचे आली रिपोर्टींग करायचे आम्ही पण थोडी जिम्मेदारी घेतो ना.

**प्रकरण क्र. ४ :-**

निविदांना मंजुरी देणे. (आरोग्य विभाग)

**ठराव क्र. ४ :-**

मनपा क्षेत्रातील कच्चे पक्के नाले सफाई/खोदाई करणे, गाळ उपसणे तसेच खाडीचे पात्र रुंद करणे, गाळ वाहतुक करणेकामी अ) जे.सी.बी. मशीन, बोटपोकलन मशीन व पोकलन मशीन भाड्याने पुरवठा करणे ब) पक्के नाले मजूरांमार्फत साफ करणे, गाळ माती डंपरमार्फत मानपाचे मालकी जागेत वाहतुक करणे, क) रोड क्रॉसिंगमध्ये आर.सी.सी. पाईप खरेदी करुन बसविणे व साचलेल्या पाण्याचा उपसा करणेकामी सक्शन पंप भाड्याने घेणे आदी विविध कामाच्या जाहिर निविदा प्रसिध्द करुन दर मागविण्यात आले होते. संबंधित

निविदाकारांनी सादर केलेले कमी दर हे जादा असल्याने त्यांना दि. १३/०५/२००८ रोजी वाटाघाटीस बोलावून त्यांनी मान्य केलेले खालील डी.एस.आर. रेट नुसार असणाऱ्या दरास ही सभा मान्यता देत आहे.

**अ) जे.सी.बी./पोकलन/बोटपोकलन मशीन पुरवठा करणे :-** १) मे. आशापुरा कन्स्ट्रक्शन यांनी गट क्र. ०१,०२,०३ व ०८ गटाकरिता २) मे. गणेश अर्थ मुव्हींग यांनी गट क्र. ०४, ०५, ०६, व ०७ करीता भाड्याने जे.सी.बी. मशिन रु. ७५८/- प्रती तास, बोटीसह पोकलन मशिन रु. १,४११/- प्रती तास व पोकलन मशिन रु. १,४११/- प्रती तास याप्रमाणे.

**ब) मजूर व डंपर पुरवठा करणे :-** १) मे. बैज्यु कंन्स्ट्रक्शन गट क्र.०१, २) मे. गणेश अर्थ मुव्हींग गट क्र.०२ व ०६ ३) मे. संकल्प ट्रेडींग गट क्र.०३,०५,०७ व ०८ ४) मे. सिध्दीविनायक अर्थ मुव्हर्स गट क्र.०४ करिता प्रती मजूर साहित्यासह रु. १५९/- व प्रती डंपर रु. १,७००/- प्रतीदिन याप्रमाणे.

**क) सक्शन पंप व आर.सी.सी. पाईप पुरवठा करणे :-** मे मनोहर ट्रेडींग कंपनी यांनी मागील वर्षीच्या मंजूर दरात पेट्रोल, डिझेल, ऑपरेटरसह म्हणजेच ५ हॉर्स पॉवर सक्शन पंप करिता रु. २५०/-, १० हॉर्स पॉवर सक्शन पंप करीता रु. ३००/- व १५ हॉर्स पॉवर सक्शन पंप करिता रु. ३२५/- प्रती तास याप्रमाणे.

२) **आर.सी.सी. NP-३ पाईप पुरवठा कामी** मे. गणेश डेव्हलपर्स यांनी निविदेत सादर केलेले सर्वात कमी दर म्हणजेच १ फुट व्यासाचे करीता रु. २,४३७/-, २ फुट व्यासाचे करिता रु. ५,६८७/- व ३ फुट व्यासाचे करीता रु. १०,०७५/- याप्रमाणे.

उक्त नाले सफाई कामाच्या दरास डी.एस.आर. च्या १० टक्के वाढीव किंवा नियमानुसार दराप्रमाणे वरील पाईप खरेदी करावी व दक्षता पथकासाठी मा. स्थायी समिती सदस्यांना घेणेत यावे व जादा मजूर मंजूर दरात घ्यावे.

तरी वरील निविदाधारकांनी / ठेकेदारांनी या कामास नकार दिल्यास मा. आयुक्तांनी त्यांच्यावर फौजदारी स्वरुपाची कारवाई करावी करीता ही सभा मान्यता देत असून येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

**सुचक :- ॲड. एस. ए. खान** **अनुमोदक :- श्रीम. शानु गोहिल**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**

**मा. सभापती :-**

सर्व सन्मा. सदस्य, सदस्या, अधिकारी वर्ग आजच्या मिटींगमध्ये उपस्थित राहिले व आजची सभा ही खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडली त्याबद्दल धन्यवाद आणि आजची सभा संपली असे मी जाहिर करतो.

**सभा संपल्याची वेळ :- दु. २.०० वाजता**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**